



पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २१८ ■ शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६


RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com





# जवान सीमेवर अन्..... घर अकोल्यात असुरक्षित !

## जवानाच्या घरी 9.70 लाखांची चोरी



प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अकोला:** 'देशाच्या रक्षणासाठी जो रात्रंदिवस सीमेवर डोळ्यात तेल घालून पहारा देतो, त्याच जवानाचे कुटुंब आज आपल्याच शहरात असुरक्षित आहे का ?' असा संतप्त सवाल या घटनेने उपस्थित केला आहे. अकोल्यातील जुने शहर पोलिस स्टेशन हद्दीत असलेल्या सागर कॉलनी परिसरात एका जवानाच्या घरातून अज्ञात चोरट्यांनी १६० ग्रॅम तब्बल ९ लाख ७० हजार रुपयांचा (बाजार भावानुसार २४ लाख ) मुद्देमाल लंपास केला. आर्मी जवानाच्या पत्नी या सर्व प्रकरणात फिर्यादी असून त्यांनी पोलिसांना संभाव्य चोर कोण यांची नावे सांगितली पण, ती एफ आय आर मध्ये ती नोंदविली नव्हती असा दावा त्यांच्या परिवाराचा आहे. त्याच बरोबर डॉग स्क्वॉड देखील संबंधितांच्या घरापर्यंत गेल्यावर देखील त्या घराची झडती का केल्या गेली नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. वाशिम बायपास रोडवरील सागर कॉलनी येथे राहणाऱ्या नेहा राजेश सावदेकर यांनी जुने शहर पोलीस स्टेशनमध्ये यासंदर्भात



तक्रार दाखल केली आहे. त्यांचे पती राजेश सावदेकर हे भारतीय सैन्यात कार्यरत असून सध्या कर्तव्यावर आहेत. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास नेहा सावदेकर या दोन मुलींच्या शाळेच्या कामासाठी आणि शेजाऱ्यांकडे गेल्या होत्या. अवघ्या दीड-दोन तासांच्या अवधीत, घर बंद असल्याचे पाहून चोरट्यांनी डाव साधला. दुपारी ३ वाजता जेव्हा त्या घरी परतल्या, तेव्हा कपाटातील दागिने आणि रोख रक्कम चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.चोरट्यांनी सोन्याचे दागिने आणि रोख रक्कमेवर हात साफ केला. वरिष्ठ पोलिस अधिकारी हे पोलिस भरतीत गुंतला असल्याने या प्रकरणाचा तपास पोलिसांनी जलद गतीने करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

### पोलिस अन् डॉग स्क्वॉडचा तपास, पण हाती काय ?

घटनेची माहिती मिळताच जुने शहर पोलीस आणि डॉग स्क्वॉड घटनास्थळी दाखल झाले. श्वान पथकाने काही अंतरापर्यंत माग काढला. जवानाच्या पत्नीने दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी संभाव्य चोरट्यांची नावे सांगितली तर चौकशी ठिकाणी पोलिसांनी सैन्य जवानाच्या पत्नीला तुम्ही संबंधितासोबत भांडण करत दागिण्यांची मागणी करा असा अजब सल्ला दिला. सीमेवर शत्रूशी लढणाऱ्या जवानाला आपले कुटुंब सुरक्षित असल्याची खात्री असायला हवी. पण अकोल्यातील या घटनेने पोलीस प्रशासनाच्या गस्तीवर आणि सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. जुने शहर पोलीस या प्रकरणाचा वेगाने तपास करून जवानाच्या कष्टाची कमाई परत मिळवून देण्याचे धाडस दाखवतील का ? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### जवानाच्या पत्नीचा एसपी ऑफिसला संताप

जवानाच्या पत्नीने आज एस पी ऑफिसला भेट देत संताप व्यक्त केला. फिर्यादीची चौकशी केली जात आहे. पण, डॉग स्क्वॉड जिथे गेले तिथे का चौकशी केल्या गेली नाही. तक्रारकर्ती नाव सांगत असताना त्याची नोंद का घेतल्या गेली नाही अशी विचारणा जवानाच्या पत्नी एस.पी.ऑफिस गाठत केली. या सर्व प्रकरणात पोलिसांनी फिर्याद घेण्यास लावलेला विलंब आणि तपास कामात पोलिस दलातील काही कर्मचाऱ्यांनी दाखविलेला गाफिलपणा अधोरेखित झाला आहे. त्यामुळे सैन्य जवानाच्या पत्नीने तीव्र संताप व्यक्त केल्याची माहिती आहे. पोलिस अधीक्षकांनी या सर्व प्रकरणात सखोल तपास करण्याचा आदेश दिला असून कठोर कारवाईचे संकेत दिल्याची माहिती आहे.

# 15 ते 17 फेब्रुवारी नरनाळा महोत्सवाची धूम....




प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अकोला:** जिल्हा प्रशासन अकोला व अकोट वन्यजीव विभाग व्दारा १५ ते १७ फेब्रुवारी दरम्यान नरनाळा महोत्सव - २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. ऐतिहासिक नरनाळा किल्ला तसेच वनसंपदेच्या माध्यमातून पर्यटकांना आकर्षित करणे तसेच तीन दिवस भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.महोत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. रविवार, १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ०८.०० ते सायं. ०५.०० जंगल सफारी, ट्रेकींग, बोटींग, नरनाळा किल्ला सफारी, वन्यजीव छायाचित्रण. दुपारी ४ ते ४.३० अॅडव्हेंचर टुरिझम चे उद्घाटन कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते होईल. उद्घाटन स्थळ: श्री संत गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड, ता. अकोट आहे. सायंकाळी ५ ते रात्री ९ वा. 'चला हवा येऊ द्या' टीमचे मनोरंजक सादरीकरण. श्री गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड, ता. अकोट जिल्हा अकोला सोमवार, १६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ जंगल सफारी, ट्रेकींग, बोटींग, नरनाळा किल्ला सफारी,वन्यजीव छायाचित्रण. सकाळी ७ वा.

मॅरेथॉन - संवर्धनासाठी धाव. (महिला ५ कि.मी. / पुरुष. ८ कि.मी.) सकाळी ०६.०० तालुका क्रिडा संकुल आकोट येथे नोंदणी सुरु होणार (सुरुवात: तालुका क्रिडा संकुल आकोट). सकाळी १० ते दुपारी २ वा. चित्रकला स्पर्धा व डान्स कॉम्पीटीशन स्थळ: श्री संत गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड, ता. अकोट जिल्हा अकोला. २ वा. पाककला स्पर्धा, स्थळ :- शहानूर प्रत्येक स्पर्धकाला १ व्यंजन बनवून आणणे अनिवार्य आहे. सायंकाळी ५ वा. शीवशंभो गर्जना टीमचे सादरीकरण, स्थळः श्री संत गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड अकोट. आणि रात्री ८ वा. इंडीयन आयडॉल विनर सलमान अली यांचे लाईव इन कॉन्सर्ट स्थळ :- श्री संत गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड, अकोट. मंगळवार, १७ रोजी सकाळी ८ ते ५ जंगल सफारी, ट्रेकींग, बोटींग, नरनाळा किल्ला सफारी, वन्यजीव छायाचित्रण. सकाळी १० वा. कवी संमेलन (मुशायरा) स्थळः श्री संत गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड, ता. अकोट, दुपारी २ वा. इन्व्हेस्टर मिट स्थळः मेळघाट टायगर रिट्रीट, मलकापूर गोंड, पोपटखेड शाहनूर रोड, अकोट. सायंकाळी ५ वा. पारितोषिक वितरण कार्यक्रम. स्थळः श्री संत गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड, अकोट आणि सायंकाळी ७ वा. पद्मश्री कैलाश खेर यांची लाईव इन कॉन्सर्ट, स्थळ श्री संत गजानन महाराज विहीर फाटा पोपटखेड रोड, अकोट येथे होणार आहे. पोपटखेड येथे ४, शहानुर येथे ४ आणि श्री संत गजानन महाराज विहीर फाटा कार्यक्रमाच्या ठिकाणी ८ स्टॉल उपलब्ध आहे. बुकींग करण्यासाठी डिसीएफ ऑफीस अकोट येथे संपर्क करावे. संपर्क क्रमांक ९१ ८३२९० ८२३४१ आहे. नरनाळा महोत्सवात येणारे अधिकारी, कर्मचारी व पर्यटकांसाठी भव्य कवी संम्मेलन (मुशायरा) मंगळवार १७ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत पोपटखेड़ रोडवरील, श्री गजानन महाराज विहिर संस्थान, स्टॉप जवळ, पोपटखेड येथे आयोजित करण्यात आला आहे. जे कवी, शायर सहभागी होणार आहेत त्यात गोपाल मापारी अकोला, जमीर अहमद जमीर अकोला, राहिल रब्बानी वठोडा अमरावती, अकील साहिल हास्य कवी अकोला, कविवर्य विठ्ठल कुलट अकोट,

विजय सोसे चांदुर बाजार, गजानन मते परतवाडा, मंगेश वानखडे अमरावती. संचालन प्रसिद्ध कवी, शायर, लेखक साबीर मुस्तफाबादी जळगाव खानदेश हे करतील. दरगाह हजरत बुरहानोद्दीन अवलीया मस्जिद व कब्रस्तान इन्तेजामीया कमेटी नरनाळा किल्ला ता. अकोटतर्फे कवींचे स्वागत केले जाईल. तसेच अकोला जिल्हा प्रशासन, वन्यजीव विभाग, अकोट व हमदर्द माइनॉरिटी सोशल वेलफेयर सोसायटी, अकोटच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

# गांजासह आरोपी जेरबंद १.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**पुसद :** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुसद ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचून गांजाची वाहतूक करणाऱ्या एका आरोपीस अटक केली. त्याच्याकडून ६ किलो २७२ ग्रॅम गांजा व मोटारसायकल असा एकूण १ लाख ६५ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यातील अवैध धंदे व अमली पदार्थ तस्करीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पथक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी पुसद व उमरखेड उपविभागात गस्त घालत असताना गुप्त माहिती मिळाली की, साई ईजारा ते काळी दौ मार्गावरून एक व्यक्ती मोटारसायकलवर गांजा घेऊन येणार आहे.माहितीच्या आधारे पोलिसांनी साई ईजारा गावाजवळील जंगल परिसरात सापळा लावला. रात्री सुमारे ८.३० वाजता संशयित व्यक्ती मोटारसायकलवर येताना दिसताच त्याला ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत त्याने आपले नाव सुनिल दादाराव आगोसे (वय ३२, रा. भिलवाडी ता. दिग्रस, जि. यवतमाळ) असे सांगितले. त्याच्या ताब्यातील प्लास्टिक पिशवीत ६ किलो २७२ ग्रॅम गांजा (किंमत १,२५,४४० रुपये) आढळून आला. तसेच मोटारसायकल (किंमत ४०,००० रुपये) जप्त करण्यात आली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये पुसद ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बी जे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे व त्यांच्या पथकाने केली.

# रोहित शेट्टी गोळीबार प्रकरणात अकोला कनेक्शन समोर

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अकोला :** दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या घरावर रविवारी गोळीबाराचा प्रकार घडला. यानंतर मुंबईसह सिनेविश्वात खळबळ उडाली. या प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ४ जणांना ताब्यात घेतलं आहे. आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, अवघ्या २४ तासांत या प्रकरणाच्या संबंधित अनेक धागेदोरे सापडले आहेत. या प्रकरणाचा थेट कनेक्शन अकोल्याशी असल्याचं तपासातून उघड झालं आहे. या गोळीबार प्रकरणाची जबाबदारी बिश्नोई टोळीनं स्वीकारल्याचा दावा करणारी पोस्ट सोशल मीडियात व्हायरल होत आहे.








CLASSIFIED

**कंपनी काम के लिय अनुभवी सेल्समन चाहिये**

-:संपर्क :-

**सियाराम मार्केटिंग**

होमअप्लांर्स गिफ्ट आर्टिकल

चित्रा टॉकीज के पास अमरावती

हमारे यह शादी, बर्थडे एवम सभी प्रसंग के लिय ठोक भाव रिटन गिफ्ट मिलते है!

9422956859
9422733033
9657901854

**भाड्याने देणे आहे**


चार रुमचे स्वतंत्र घर १६०० स्क्वे. फुट वरील बांधकाम

सरकारी, निम सरकारी, वित्तिय संस्था, पॅथॉलॉजी, ब्लड बँक, फिजिओ थेरपीस्ट, कोचिंग क्लास करिता

भाड्याने देणे आहे

पत्ता: गोरक्षण रोड विभागात, अकोला

9421438098
9822361001






सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सुरंगा नदीत अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**तिवसा:** तालुक्यातील शेंदोळा खुर्द परिसरात सुरंगा नदीपात्रात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही घटना शुक्रवारी (१४ फेब्रुवारी) सकाळी उघडकीस आली. स्थानिक नागरिक व शेतकरी नदीकाठी गेले असताना त्यांना पाण्यात एक मृतदेह दिसला. मृतदेह कुजलेल्या अवस्थेत असल्यामुळे तो काही दिवसांपूर्वीचा असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. लगेच याची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह बाहेर काढला असून शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तो अपघात, आत्महत्या की अन्य काही प्रकार आहे याचा तपास सुरू आहे. मृत व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असून नागरिकांनी काही माहिती असल्यास पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# उर्ध्व वर्धा कालवा सल्लागार समितीची बैठक संपन्न

## ♦ जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची पाणी आरक्षणास मंजुरी

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अमरावती:** जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समिती व पाणी आरक्षणाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सन २०२५-२६ या वर्षासाठी उर्ध्व वर्धा प्रकल्पातून सोडण्यात येणाऱ्या पाणी आवर्तनाचे नियोजन आणि बिगर सिंचन पाणी आरक्षणाबाबत चर्चा करून विविध निर्णयांना मंजुरी देण्यात आली.

उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे लाभक्षेत्र अमरावती आणि वर्धा या दोन्ही जिल्ह्यांत असून, प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या दोन्ही कालव्यांमधून रब्बी हंगामासाठी पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. अधीक्षक अभियंता मनीष राजभोज यांनी बैठकीत माहिती दिली की, रब्बी हंगाम २०२५-२६ साठी एकूण ३१ हजार हेक्टर सिंचन क्षेत्राचे नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत या दोन्ही कालव्यांद्वारे ३ पाणी पाळ्यांची आवर्तने पूर्ण झाली असून, त्यातून १० हजार हेक्टर क्षेत्रावर सिंचन झाले आहे. उर्वरित २ आवर्तने मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून, जलसंपदा व कृषी विभागाने समन्वय साधून उन्हाळी पिकांच्या क्षेत्रात वाढ करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी यावेळी दिले.

या बैठकीत सन २०२५-२६ या वर्षासाठी बिगर सिंचन पाणी आरक्षणासही मंजुरी प्रदान करण्यात आली. यामध्ये पिण्यासाठी ६१.९११ दलघमी, औष्णिक वीज केंद्रासाठी २५.००० दलघमी आणि संभाव्य औद्योगिक पाणीपुरवठ्यासाठी २.५० दलघमी असे एकूण ८९.४११ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. बिगर सिंचन ग्राहक पाणीपुरवठा योजनेची थकबाकी मोठ्या प्रमाणात असल्याचे निदर्शनास आल्यामुळे, संबंधित यंत्रणांनी मार्च २०२६ पूर्वी ही थकबाकी वसूल करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीला दूरदृष्य प्रणालीद्वारे विधानपरिषद सदस्य दादारावजी केचे उपस्थित होते. सर्व लाभधारकांना विहित वेळेत पाणी पोहोचण्याबाबत नियोजन करण्याचे त्यांनी निर्देश दिले. बैठकीस उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत, जिल्हा कृषी अधिकारी राहुल सातपुते, महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक एस. पी. देशमुख, कार्यकारी अभियंता अमोल गुरव, गु. उमप यांच्यासह उर्ध्व वर्धा सिंचन मंडळाचे सर्व उपविभागीय अभियंता उपस्थित होते.

# अंडी पुरवठा घोटाळ्यात तिघांना कारणे दाखवा नोटीस

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी




**धारणी:** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात घडलेल्या ९० लाखांच्या अंडी पुरवठा घोटाळ्याने पुन्हा एकदा मेळघाट प्रशासन हलवून सोडले आहे. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेने उपायुक्तांना निवेदन देत तत्काळ कारवाईची उपायुक्ताना निवेदन देत तत्काळ कारवाईचा मागणी केल्याने प्रकरणाला नवी कलाटणी मिळाली आहे. अंडी पुरवठ्याचे अतिशय संशयास्पद देयक तयार झाल्यानंतर संबंधित द मानतर सवात फाईल कार्यालयातून खिडकी तोडून आणि कपाट फोडून गायब करण्यात आली होती. कार्यालयात अनेक कपाट असताना, नेमके अंडी पुरवठा देयकाची फाईल असलेल्या कपाटालाच लक्ष्य केले गेल्याने अंतर्गत संगनमताचा तीव्र संशय उपस्थित होत आहे.

प्रकरणानंतर प्रशासनाने पोलिसांत तक्रार दिली होती; मात्र दीर्घ कालावधी उलटूनही आरोपी सापडला नाही. त्यामुळे प्रकरण जाणीवपूर्वक थंडबस्त्यात टाकले गेले. असा आरोप आदिवासी संघटनांनी केला आहे. दरम्यान, माध्यमांमध्ये बातमी प्रसिध्द झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी कार्यालयात खळबळ उडाली आनी उच्चस्तरीय चौकशी समिती गठित करण्यात आली. या समितीने संपूर्ण घडामोडींची तपासणी करून अप्पर आदिवासी आयुक्तांकडे सविस्तर अहवाल सादर केला आहे, ज्यात कार्यालयातील काही अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू आहे. अंडी पुरवठ्याची बिले मंजूर होऊन देयके निघाली: परंतु त्याच कालावधीत केलेल्या केळी पुरवठ्याचे देयक मात्र आजही प्रलंबित असल्याने देयक प्रक्रिया निवडक पद्धतीने करण्यात आल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. एका बाजूला प्रत्यक्ष केळीचा पुरवठा करणाऱ्या पुरवठाधारकाचे देयक थकवले गेले, तर दुसऱ्या बाजूला अंड्याचे काल्पनिक देयक प्रक्रिया करून निधी गहाळ करण्यात आल्याचा आरोप आदिवासी विकास परिषदेने केला आहे. या प्रकरणात आता स्थानिक आदिवासी संघटना अत्यंतआक्रमक बनल्या असून, दोशीवर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, आदिवासी भागासाठी असलेला विकासाचा निधी गहाळ करणारे अधिकारी कोणत्याही परिस्थितीत सुटता कामा नयेत. प्रकल्प कार्यालयात घडलेली फाईल चोरी ही साधी चोरी नसून महाघोटाळा लपवण्याचा सुनियोजित प्रयत्न आहे.

# ना. एकनाथजी शिंदे यांच्याकडे निवेदन सादर; उच्च स्तरीय बैठकीची मागणी पुन्हा जोरात

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अमरावती:** कोळी महादेव समाजाच्या जात प्रमाणपत्रासह इतर महत्वपूर्ण प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय घेण्यासाठी ना . फडणवीस मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक बोलविण्यास आपण पुढाकार घ्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कृती समितीचे महासचिव उमेश महादेवराव ढोणे यांनी केली आहे.

या संदर्भात उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख ना.एकनाथजी शिंदे यांनी व्यस्त कार्यक्रमातून



उमेश ढोणे यांना वेळ देत त्यांचे निवेदन स्वीकारले त्या बाबत शिंदे साहेबांचे आभार मानले.

आपण मुख्यमंत्री असताना या विषयावर बैठक झाली होती; मात्र ठोस निर्णय न झाल्याने प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परिणामी समाजात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

संबंधित विभागांच्या उपस्थितीत लवकरात लवकर सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणीही पुन्हा निवेदनातून ढोणे यांनी ना.शिंदे यांच्याकडे केली.

# निजामपूर स्मशानभूमीजवळ आढळला बिबट्याचा मृतदेह

**अमरावती :** अमरावतीनजीकच्या निजामपूर येथील मारुती मंदिरामागील स्मशानभूमीजवळ एका झाडाखाली मादी बिबट मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. शुक्रवारी सकाळी ही माहिती समोर येताच गावकऱ्यांनी घटनास्थळी गर्दी केली.ष्घटनेची माहिती मिळताच वन विभाग व पोलिस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. वन अधिकाऱ्यांनी व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी पाहणी करून संबंधित वन्यप्राण्याची ओळख मादी बिबट अशी पटवून दिली. मात्र, त्याच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवालानंतरच मृत्यूचे कारण समोर येईल, असे वन विभागाने सांगितले. पंचनामा करून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. संबंधित बिबट गेल्या तीन महिन्यांपासून गावाच्या परिसरात वावरत होता. याबाबतची माहिती यापूर्वीच वन विभागाला देण्यात आली होती. अमरावती वन विभागांतर्गत वरूड वनक्षेत्रात पंधरा दिवसांपूर्वी एक वाघ मृतावस्थेत आढळून आला होता. तपासाअंती त्या वाघाची शिकार झाल्याचे उघड झाले असून या प्रकरणात वन विभागाने चार आरोपींना अटक केली आहे.

# पूर्णा नदीकाठी कोटेश्वर मंदिरात महाशिवरात्रीला भक्तांचा जनसागर; भाविकांची मोठी गर्दी

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**भातकुली:** तालुक्यातील खोलापूर येथे पूर्णा नदीच्या काठावर वसलेले श्री. कोटेश्वर मंदिर महाशिवरात्रीच्या निमित्ताने भक्तांनी गजबजून गेले. या प्राचीन मंदिराला धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व असल्याने दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात.



महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळपासूनच भाविकांनी रांगा लावून भगवान शिवाचे दर्शन घेतले. अनेक भक्तांनी उपवास ठेवून पूजा-अर्चा केली. मंदिर परिसर आकर्षक रोषणाई, स्वच्छता आणि सजावटीमुळे अधिक सुंदर दिसत होता. भजन-कीर्तन, नामस्मरण आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे वातावरण भक्तिमय झाले होते. मंदिर परिसरात प्रसाद, खेळणी व पूजा साहित्याची दुकाने लावण्यात आली होती. त्यामुळे यात्रेचे स्वरूप निर्माण झाले होते. भाविकांनी कुटुंबासह दर्शन घेऊन उत्सवाचा आनंद घेतला. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पोलिस प्रशासनाकडून विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शांततेत व उत्साहात महाशिवरात्रीचा उत्सव पार पडल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले.

# अमरावतीत २४ फेब्रुवारीला मालमत्ता कर विषयक विशेष जनसंवाद

## ♦ प्रलंबित मालमत्ता कर तक्रारींच्या निवारणासाठी महानगरपालिकेचा पुढाकार

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अमरावती :** अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर संदर्भातील मोठ्या प्रमाणात तक्रारी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. झोन तसेच मुख्य कार्यालय स्तरावर या तक्रारींचे निवारण अपेक्षित प्रमाणात न झाल्यामुळे मालमत्ता कर वसुली प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत.

या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निवारण करण्यासाठी दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, महानगरपालिका कार्यालय, राजकमल चौक येथे मालमत्ता कर संदर्भातील जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या जनसंवाद कार्यक्रमात मालमत्ता करासंबंधी प्रलंबित तक्रारी, नोंद दुरुस्ती, थकबाकी, कर आकारणी आदी विषयांवर प्रत्यक्ष सुनावणी करून तत्काळ मार्गदर्शन व कार्यवाही करण्यात येणार आहे.

मालमत्ता धारकांनी आपल्या तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन मालमत्ता कर विषयक समस्या मार्गी लावाव्यात, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# अमरावतीत भररस्त्यात सराफा व्यापाऱ्याला लुटले; ७०-८० तोळे सोने लंपास

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अमरावती:** शहरात गुन्हेगारीची गंभीर घटना समोर आली आहे. शुक्रवारी रात्री सुमारे १० वाजता कठोरा मार्ग परिसरात 'सुमित्रा ज्वेलर्स आर्ट'चे मालक सुशांत शेरेकर यांना अज्ञात दरोडेखोरांनी लुटले. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नेहमीप्रमाणे दुकान बंद करून सुशांत शेरेकर हे मौल्यवान दागिने दुचाकीच्या डिक्कीत ठेवून घरी जात होते. दुकानापासून सुमारे ५०० मीटर अंतरावर ३-४ आरोपी तपकिरी रंगाच्या कारमध्ये दबा धरून बसले होते. त्यांनी अचानक दुचाकीसमोर कार आडवी घातली. त्यामुळे शेरेकर यांचा तोल गेला आणि ते रस्त्यावर पडले.

त्यानंतर आरोपी कारमधून उतरले, चाकूचा धाक दाखवत त्यांना मारहाण केली आणि दुचाकीची डिक्की उघडून अंदाजे ७० ते ८० तोळे सोन्याचे दागिने घेऊन पळ काढला.

घटनेनंतर सुशांत शेरेकर यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. गाडगे नगरचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. तसेच पोलीस आयुक्त राकेश ओला यांनीही प्रत्यक्ष पाहणी केली.

घटनेनंतर शहरात नाकेबंदी करण्यात आली असून विविध तपास पथके आरोपींच्या शोधात आहेत. मात्र रात्री उशिरापर्यंत आरोपींबाबत ठोस माहिती मिळाली नव्हती. या घटनेमुळे कायदा-सुव्यवस्थेबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

# नवसारी टी-पॉइंटवर भीषण अपघात

## जनावरांनी भरलेली गाडी उलटली, अंजनगावच्या युवकाचा जागीच मृत्यू

**अमरावती:** आज सकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास नवसारी टी-पॉइंट परिसरात भीषण अपघात घडला. जनावरांनी भरलेली एक गाडी अचानक नियंत्रण सुटल्यामुळे उलटली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला जाऊन जोरात धडकली. अपघात इतका गंभीर होता की गाडीत असलेल्या लोकांमध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात अंजनगाव येथील अब्दुल साजिर अब्दुल माजिद (राहणार चपराशी पुरा) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. धडक जोरात झाल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली आणि ते घटनास्थळीच मरण पावले, अशी माहिती मिळाली आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि पोलिस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत पुढील कार्यवाही सुरू केली. गाडीतील जनावरांनाही काही प्रमाणात इजा झाल्याचे सांगितले जात आहे. अपघात नेमका कशामुळे झाला याचा तपास पोलिसांकडून सुरू असून वाहनाचा वेग, रस्त्याची स्थिती किंवा इतर कारणांची चौकशी केली जात आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून मृताच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

# निधीअभावी अमरावतीतील विकासकामे ठप्प

## ♦ वडाळी, छत्री तलाव व टाऊन हॉलचे काम ५ वर्षांपासून रखडले

**अमरावती :** अमरावती शहरातील महत्त्वाची विकासकामे गेल्या पाच वर्षांपासून निधीअभावी रखडलेली आहेत. वडाळी तलाव, छत्री तलाव आणि टाऊन हॉलच्या कामांना अजूनही गती मिळालेली नाही. यामुळे शहराच्या सौंदर्यवृद्धी आणि नागरिकांच्या सोयीसुविधांवर परिणाम होत आहे.

महापालिकेकडून या कामांसाठी निधीची मागणी करण्यात आली होती, मात्र अपेक्षित निधी मिळाला नसल्याने कामे पुढे सरकू शकली नाहीत. काही ठिकाणी सुधारित आराखडे तयार झाले असले तरी प्रत्यक्ष काम सुरू होण्यास अजून वेळ लागण्याची शक्यता आहे.

शहरातील नागरिकांनी ही कामे लवकर पूर्ण व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तलाव परिसर विकसित झाल्यास पर्यटनाला चालना मिळेल तसेच नागरिकांसाठी विरंगुळ्याची चांगली सोय उपलब्ध होईल. प्रशासनाने लवकर निधी उपलब्ध करून ही विकासकामे पूर्ण करावीत, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

# महा सत्संग सोहळ्याचे आयोजन; अमरावतीत सामूहिक स्वामी चरित्र पठण

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अमरावती:** येथे भक्तांसाठी आध्यात्मिक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने महा सत्संग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ यांच्या विदर्भ विभागातर्फे आयोजित करण्यात आला असून परमहंस गुरुमाऊली श्री आण्णासाहेब मोरे यांच्या दिव्य सान्निध्यात हा सोहळा पार पडणार आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता श्री संत गाडगेबाबा मंदिर समोरील प्रांगणात, पंचवटी चौक परिसरात आयोजित करण्यात आला आहे. या वेळी विश्वशांतीच्या हेतूने सामूहिक श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत पठण करण्यात येणार आहे.

आयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, या कार्यक्रमाचा उद्देश समाजात आध्यात्मिक जागरूकता वाढवणे, सकारात्मक विचार रुजवणे आणि भक्तांना एकत्र आणणे हा आहे. सत्संगामुळे मानसिक शांती मिळते तसेच समाजात बंधुभाव वाढतो, असा आयोजकांचा विश्वास आहे.

या सोहळ्यात मोठ्या संख्येने भक्त उपस्थित राहण्याची अपेक्षा असून सर्वांनी वेळेत उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः अमरावती परिसरातील भक्तांनी सहभागी व्हावे, असे आयोजकांनी सांगितले. अधिक माहितीसाठी आयोजकांकडे संपर्क साधता येणार असून, भक्तांनी या आध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होऊन वातावरण भक्तिमय करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरा'तून लाभार्थ्यांना दाखल्यांचे वितरण

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**खामगाव :** महाराष्ट्र शासनाच्या जनहितकारी धोरणानुसार, महसूल प्रशासन जनतेच्या दारी नेण्याच्या उद्देशाने १२ फेब्रुवारी रोजी राजस्व मंडळ हिवरखेड अंतर्गत 'छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर' जिल्हा परिषद विद्यालय, रोहना येथे उत्साहात पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय दाखले व योजनांच्या लाभांचे थेट वितरण करण्यात आले.

**मान्यवरांची उपस्थिती आणि उद्घाटन:** कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोहना ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती सविताताई गव्हाळे होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून नायब तहसीलदार निखिल पाटील, संजय गांधी योजनेचे नायब तहसीलदार शिरीष वसावे, उपसरपंच यशोदाबाई खंडारे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष



रामदास बोचरे, मुख्याध्यापिका पुष्पा कोळी, ग्रा.पं. सदस्य जयश्री घोगले, वैभव राहणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

**योजनांची माहिती आणि जनजागृती:** प्रास्ताविक करताना मंडळ अधिकारी नितीन देशमुख यांनी महसूल विभाग व इतर संलग्न विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती दिली. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे जातीचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र आणि उत्पन्न दाखले जास्तीत जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्याचा विभागाचा मानस त्यांनी व्यक्त केला. तसेच त्यांनी ग्रामीण भागातील शेतजमिनीच्या पोट-हिश्श्यांची मोजणी करून नकाशे व सातबारा अधिकार अभिलेख अद्यावत करण्याबाबतच्या नवीन शासन निर्णयाची माहिती दिली. ग्राम महसूल अधिकारी दिनेश शेळके यांनी 'जिवंत सातबारा' मोहिमेचे महत्त्व विशद केले.

या शिबिरामध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात एकूण ५१ दाखल्यांचे व लाभांचे वाटप करण्यात आले. यामध्ये जातीचे दाखले, अधिवास प्रमाणपत्र, विशेष अर्थसहाय्य योजना (मंजुरी आदेश), आर.ओ. कॅन व जन्म प्रमाणपत्र (ग्रा.पं. कंझारा), वारस फेरफार, ७/१२ व ८अ उतारा, द्रवरूप जैविक खत होते.

# चिखलदरा येथे पर्यटन विकासासाठी प्रयत्न करणार - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**अमरावती:** चिखलदरा येथे स्काय वॉक, गोलमार्ग, ग्लो गार्डन, मधाचे गाव आमझरी आदी उपक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी प्रशासनातर्फे पाठपुरावा करण्यात येत आहे. चिखलदरा परिसरात पर्यटन क्षेत्र विकासाला वाव असून याठिकाणी पर्यटकांसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.(जिल्हाधिकारी कार्यालयात पर्यटन आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी चिखलदरा येथे सिडकोमार्फत स्कायवॉकचा आढावा घेतला. स्कायवॉकची लांबी असल्याने मध्यभागी आधार द्यावा लागणार आहे. यासाठी वनविभागाची परवानगी घेण्यात आली आहे.

या स्कायवॉकला कायमस्वरूपी आधार द्यावा लागणार असल्यामुळे या भागातून माकड किंवा इतर प्राणी चढून जाऊ नये, म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. यासोबतच २७ किलोमीटरचा गोलमार्ग तयार करण्यात येणार आहे. वन क्षेत्रातून जाणाऱ्या मार्गासाठी वनविभागाची परवानगी घ्यावी. तसेच ग्लो गार्डनसाठी शक्यता तपासून पहाव्यात. चिखलदरा येथे पर्यटन वाढीसाठी नवीन प्रकल्प राबविणे आवश्यक आहे.

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# शिवजयंतीनिमित्त दोन दिवस सांस्कृतिक कार्यक्रम

**अकोला :** सांस्कृतिक कार्य संचालनालय व जिल्हा प्रशासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि. १८ व १९ फेब्रुवारी रोजी अकोला येथे भव्य सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे शौर्य, पराक्रम व त्यांच्या जीवनातील उदात्त मानवी मूल्यांची नवीन पिढीमध्ये रूजवणूक व्हावी या हेतूने त्यांच्या अतुलनीय शौर्यावर व कर्तृत्वावर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दि. १८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित भव्य नाट्यप्रयोग होणार असून, दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवरायांच्या जीवनावर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. हे दोन्ही कार्यक्रम जुन्या शहरातील गोडबोले प्लॉटमध्ये शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या पद्मानंद सभागृह येथे सायं. ५ ते रा. ९ या वेळेत होणार आहेत.

## महाकालेश्वर संस्थान शिवर येथे महाशिवरात्रीनिमित्त दोन दिवसीय धार्मिक सोहळ्याची रेलचेल



**अकोला:** श्री शिव चॅरिटेबल ट्रस्ट शिवरद्वारा संचालित अतिशय प्राचीन व जागृत महाकालेश्वर संस्थान, शिवर येथे महाशिवरात्रीनिमित्त १५ व १६ फेब्रुवारी २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ६.३० वाजता रुद्राभिषेक व पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. दुपारी १२ वाजता फराळाचे वितरण करण्यात येणार आहे. त्यानंतर मुक्ताई महिला हरिपाठ मंडळ, शिवर यांच्याकडून बहारदार भक्तीगीतांचा कार्यक्रम सादर केला जाणार आहे. सायंकाळी ७ वाजता मंदिर परिसरात दीपोत्सव साजरा करण्यात येईल. रात्री ८ वाजता सामूहिक महाआरती होऊन त्यानंतर माऊली हरिपाठ मंडळ, शिवर यांचा भक्तीगीतांचा कार्यक्रम रंगणार आहे.

## शिव गौरा विवाह महोत्सवाचे भूमिपूजन भक्तीभावात



**अकोला:** शिव गौरा विवाह महोत्सव समितीच्या वतीने महाशिवरात्री दिनी स्थानीय रिझर्व्ह माता मंदिर मैदानात आयोजित भव्य शिवगौरा विवाह महोत्सवाच्या स्थळाचे भूमिपूजन मोठ्या भक्तीभावात संपन्न झाले.पंडित वर्गाच्या मंत्रोच्चारात मान्यवरांनी जमिनीवर कुदळ चालवून रीतसर भूमिपूजन केले.या नंतर भव्य मंडप उभारणीस प्रारंभ करण्यात आला.दरम्यान नुकताच राजेश्वर मंदिरात या शिव गौरा विवाह महोत्सवाची शिव पूजा करून विवाह साहित्य रिझर्व्ह माता मंदिरात आणून मातेच्या अर्पण कार्यक्रमाने हा महोत्सवाचा प्रारंभ करण्यात आला.महोत्सवात शनिवार दि १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६-३० वाजता गणेश पूजन,मेहंदी कार्यक्रम व भजन संध्या होणार आहे. सर्व माता भगिनींना या कार्यक्रमात मेहंदी लावण्याची व्यवस्था समिती च्या वतीने करण्यात येणार आहे.

# अकोला बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड. अजय वाघमारे

### ♦ उपाध्यक्षपदी ॲड. गवई, ॲड. भांबेरे, सचिवपदी ॲड. कोरडे विजयी

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**अकोला:** अकोला बार असोसिएशनच्या निवडणुकीत चुरस दिसून आली. अध्यक्षपदी ॲड. अजय वाघमारे यांचा दणदणीत विजय झाला. उपाध्यक्षपदी ॲड. गवई, ॲड. भांबेरे तर सचिवपदी ॲड. कोरडे विजयी झाले. निवडणूक निर्णय अधिकारी ॲड. नाईक यांनी शुक्रवारी घोषणा केली.

अध्यक्षपदासाठी झालेल्या तिरंगी लढतीत ॲड. अजय तुळशीदास वाघमारे यांनी ६८२ मते मिळवत विजय मिळविला. त्यांचे प्रतिस्पर्धी ॲड. हेमसिंह मोतीसिंह मोहता ६३३ मते मिळाली. उपाध्यक्षपदी ॲड. विजय प्रभाकरराव भांबेरे यांनी ६७५ मते मिळवून विजय संपादन केला. ॲड. सुमेध गोवर्धन डोंगरदिवे व ॲड. राहुल पंजबराव वानखेडे यांना अनुक्रमे २६४ व ३७५ मते मिळाली. संयुक्त सचिव पदासाठी ॲड. प्रमोद देवीदास कोरडे यांनी ७०० मते मिळवत प्रतिस्पर्ध्यावर मात केली. ॲड. आकाश मदन भगत (४९७) व ॲड. पवनेश रमेशचंद्र अग्रवाल (१२१) यांना अनुक्रमे मते मिळाली. या निवडणुकीत सर्वच पदांसाठी चुरस निर्माण झाली होती. महिला उपाध्यक्षपदासाठी झालेल्या लढतीत ॲड. शीतल देवानंद गवई यांनी ५५२ मते मिळवत बाजी मारली. ॲड.शारदा मनोहरलाल मल्होत्रा (३७८), ॲड. निर्मला महेंद्र नागदेवे, ॲड. मंजू मधुकर सावरकर (१६३) व ॲड. संगीता गावंडे यांना ७६ मते मिळाली.

नवीन कार्यकारिणी कडून अपेक्षा नव्या कार्यकारिणीकडून बार असोसिएशनच्या वकिलांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका आणि न्यायालयीन कामकाजात सुसूत्रता आणण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. अकोल्यातील विधिज्ञ वर्तुळात या निकालाची चर्चा आहे.

# अकोल्यात १९ फेब्रुवारीपासून चार दिवसीय दिव्य भक्ती संगम

### ♦ विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, सनातन संस्कृतीचा होणार जागर

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**अकोला :** राजराजेश्वर नगरी ही धार्मिक कार्यक्रमासा'ी नेहमीच ओळखली जाते. वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत असून येथे देशातील प्रसिद्ध प्रवचनकार, प्रबोधनकार व कीर्तनकारांनी हजेरी लावलेली आहे. याच पृष्ठभूमीवर परमपूज्य सद्गुरू श्री सुधांशू महाराज यांच्या अमृतवाणीचा अकोलेकरांना लाभ मिळणार आहे. गोरक्षण रोडवरील गोरक्षण संस्थानमागील भव्य प्रांगणात १९ ते २२ फेब्रुवारीदरम्यान चार दिवसीय दिव्य भक्ती संगमचा कार्यक्रम आयोजित केला आहे, असे विश्व जागृती मिशन अकोला मंडळ यांच्यावतीने कळविण्यात आले आहे. दिव्य भक्ती सत्संग कार्यक्रमाचा शुभारंभ गुरूवार, १९ फेब्रुवारीला सायंकाळी ४ ते ६.३० वाजेदरम्यान होणार आहे तर २० ते २२ फेब्रुवारी या कालावधीत सकाही ९ ते ११.३० व सायंकाळी ४ ते ६.३० वाजेदरम्यान भाविक भक्तांचा सुधांशूजी महाराज यांच्या अमृतवाणीचा लाभ घेता येणार आहे. या दरम्यान शुभारंभदिनी शहरातून दुपारी ३ वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे. तसेच २० फेब्रुवारीला वारकरी संप्रदायाचा रिंगण सोहळा सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. त्याचप्रमाणे योद्धा ढोल ताशा व ध्वज पथक अकोलाद्वारे ढोल ताशा वादनाचा कार्यक्रम २१ फेब्रुवारीला सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. त्यानंतर मंत्र दीक्षा कार्यक्रम २२ फेब्रुवारीला सकाळी ११.३० वाजता होणार आहे. या सर्व कार्यक्रमांचे आयोजन विश्व जागृती मिशन अकोला मंडळाद्वारे करण्यात आला असून, याचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन निवेदक धर्माचार्य श्री शिवदत्त समन्वयक, पुरूषोत्तम वानखडे प्रधान व विश्वजितसिंह सिसोदिया महामंत्री यांच्यासह विश्व जागृती मिशन अकोल्याच्यावतीने करण्यात आले आहे.

# अडगाव बु. मधील अवैध धंद्यांनी घेतला तिघांचा बळी

### ♦ पोलिस प्रशासन आता तरी जागे होणार का ?

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**हिवरखेड:** अडगाव बु. येथे कित्येक वर्षापासून अवैध धंदे सुरू आहेत. मात्र पोलिसांचा वचक पाहिजे तसा नाही. उलट हेच अवैध धंदे करणारे पोलिस विभागावर वचक टाकून बसले असे म्हणणे वावगे ठरणार नाही. यातून कालची दुर्दैवी घटना घडली.

या अगोदर अवैध धंदे करणाऱ्यांनी पोलिसाविरुद्ध लाचलुचपत विभागाकडून जाळे रचले होते. तेव्हापासून अवैध धंदे करणारे दादागिरीने पुढे आले. अडगावात अवैध धंदे करणारे दारू, गांजा, अवैध पेट्रोल, डिझल,अवैध गुटखा, अवैध रेती उत्खनन, तांदूळाचा काळाबाजार या सारखे अनेक अवैध धंदे करतात. व्यापाऱ्याच्या अवैध डिझलने याचं गावात तीन निष्पाप लोकांचा जीव घेतला.

या अगोदर सुद्धा बातम्यांनी पोलिसांना सावधगिरीचा इशारा दिला होता. परंतु कुठल्याच बातमीची पोलिसांनी दखल घेतली नाही., शेवटी अनर्थ घडलाच, १२ फेब्रुवारीच्या रात्री अवैध डिझलने पेट घेतला व मोठा आगीचा तांडव निर्माण झाला आणि या आगीत दुदैवाने या मध्ये निष्पाप चिमुकलीसह एक महिला व तरुण असा तिघांचा मृत्यू झाला.

या घटनेने तालुक्यात दुःख व्यक्त करण्यात आले. गावातील अवैध धंदे बंद करण्यात यावे व अवैध डिझल साठा ठेवणाऱ्या आरोपीं विरुद्ध कठोर कारवाई पोलिसांनी करावी अशी मागणी जोर धरत आहे. अडगावंचे अवैध धंदे बंद झाल्यावरच व या अवैध डिझल विक्री करणाऱ्यावर कारवाई झाल्यावरच मृतक कुटुंबाना न्याय मिळेल अशी जन भावना आहे.

# सर्वोपचार मधील वक्तव्याबद्दल आमदार साजीदखान पठाण यांची दिलगिरी, मात्र, कामबंद आंदोलन कायम

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**अकोला :** सर्वोपचार रुग्णालयातील वाद शमताना दिसत नाही. गुरुवारी पाहणी दरम्यान गंभीर त्रुटी आढळल्याचा दावा आ. साजीद खान पठाण यांनी केला. रुग्णांना मिळणाऱ्या सुविधांचा दर्जा, स्वच्छतेची अवस्था, डॉक्टरांची अनुपस्थिती तसेच वॉर्डमधील नर्सेस, वार्डबॉय आणि सुरक्षा रक्षकांकडून मिळणाऱ्या कथित उद्धट वागणुकीच्या तक्रारींमुळे वातावरण चांगलेच तापले. एका वॉर्डमध्ये महिला रुग्ण व तिच्या नातेवाईकांनी तेथे उपस्थित नर्स व सुरक्षा रक्षकांकडून मिळणाऱ्या कथित उद्धट वागणुकीबाबत तक्रार केली. त्यानंतर आ. पठाण यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना कणखर शब्दांत जाब विचारला. या घटनेनंतर काही कर्मचारी संतप्त झाले. या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न आ. पठाण यांनी केला. परंतु परिचारिका संपावर ठाम आहेत. शनिवारी सकाळी कर्मचाऱ्यांनी निदर्शने केली.

नर्स स्टाफने आमदारांनी उद्धट भाषेचा वापर केला, असा आरोप काही कर्मचाऱ्यांनी केला. त्यावर प्रत्युत्तर देताना आ. पठाण म्हणाले, मी जनतेला परिपूर्ण आरोग्य सेवा मिळावी यासाठी कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. जर माझ्या बोलण्यामुळे कोणाला वाईट वाटले असेल, तर मी माघार घेतो व दिलगिरी व्यक्त करतो. मात्र, उद्या जर गरजू रुग्णांना योग्य आरोग्य सेवा मिळाली नाही, तर संबंधित आरोग्य कर्मचाऱ्यांना जाब द्यावा लागेल असे म्हटले आहे.

या संपूर्ण घडामोडींमुळे सर्वोपचार रुग्णालयातील व्यवस्थापन, कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यातील तणाव उघडपणे समोर आला असून, आता प्रशासन कोणती ठोस पावले उचलते याकडे लक्ष लागले आहे.

# दिनोडा मरोडा मार्गावरील पुलाच्या बाजूचा रस्ता दबला, दुरुस्तीची ग्रामस्थांची मागणी

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**कुटासा :** अकोट तालुक्यातील दिनोडा ते मरोडा या मार्गावर असलेल्या पठार नदीवर नुकतेच नवीन पुलाचे बांधकाम करण्यात आले. मात्र सदर कामाला काही महिने पूर्ण होत नाही तोच पुलाच्या बाजूने कॉंक्रीट रस्ता दबल्यामुळे अपघाताची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सदर पुलाचे काम निष्कृष्ट दर्जाचे झाल्याचे दिसून येते, मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे साफ दुर्लक्ष आहे.

दिनोडा गावच्या पठार नदीवर दोन पुलांचे बांधकाम करण्यात आले आहे. दिनोडा ते मरोडा मार्गावर मोठा निधी खर्च करून शासनाने पुलाचे बांधकाम केले. सदर काम काही महिन्यापूर्वीच पूर्ण झाले. पुलाच्या बाजूला दोन्ही कडेला सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता करण्यात आला.परंतु पुलाला लागूनच कॉंक्रीट दबल्यामुळे त्याठिकाणी कोणत्याही क्षणी अपघात घडण्याची शक्यता गावकरी व्यक्त करीत आहेत. या पुलावरून वाहनांची वाहतूक सुरु होताच सदर रस्ता पूर्णत:दबला व कॉंक्रीट उखडले.यावरून सदर काम निष्कृष्ट दर्जाचे केल्याचे दिसून येत आहे. तरी सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष देऊन झालेल्या कामाची पाहणी करून तत्काळ पुलाची दुरुस्ती करावी अशी मागणी दिनोडा ग्रामस्थांकडुन होत आहे.

# सेंट पॉल्स अकॅडमीची वेदिका जायले हिची भरारी

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**अकोट:** शेतकरी कुटुंबातील वेदिका विक्रम जायले हिने ६९ व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धेत यश प्राप्त केले. बिलासपूर येथे ३ ते ८ फेब्रुवारी दरम्यान झालेल्या स्पर्धेत सेंट पॉल्स अकॅडमी येथील दहावीची विद्यार्थीनी वेदिका जायलेने १७ वर्षा आतील गटात कांस्यपदक पटकावले तसेच मुलींच्या संघाने तिसरा क्रमांक पटकावला.

यशाचे श्रेय नवनीत लखोटिया, लुनकरण डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया यांना दिले. वेदिकाने संस्थाध्यक्ष विजय चांडक, मुख्याध्यापक विजय बिहाडे, उप मुख्याध्यापक ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पर्यवेक्षक अभिजीत मेंढे, मालती महल्ले, सारिका रेळे, वैशाली गावत्रे, क्रीडा प्रशिक्षक नलिनी जाधव, स्वप्निल चांदेकर, प्रणव देंडव, क्रीडा शिक्षक अभिलाष काळमेघ, नारायण वानखडे व आई वडिलांना दिले आहे.

# डॉ. उमेश चिंचमलातपुरे यांना प्रतिष्ठित 'फेलो पुरस्कार'; गोव्यातील राष्ट्रीय चर्चासत्रात गौरव




प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापी'ातील प्राध्यापक तथा मुख्य विस्तार शिक्षण अधिकारी डॉ. उमेश चिंचमलातपुरे यांना भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या इंडियन सोसायटी ऑफ एक्सटेंशन एज्युकेशन, नवी दिल्ली यांच्या वतीने प्रदान करण्यात येणारा 'प्रतिष्ठित फेलो' पुरस्कार जाहीर झाला आहे. गोवा येथे नुकत्याच पार पडलेल्या 'शाश्वत अन्न प्रणाली आणि आत्मनिर्भर भारतासा'ी डिजिटल तंत्रज्ञान' या विषयावरील आयएसईई राष्ट्रीय चर्चासत्रात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या पुरस्कारासा'ी देशभरातील संशोधकांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यामधून पश्चिम विभागातून डॉ. चिंचमलातपुरे यांची निवड करण्यात आली. भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या कृषी विस्तार शाखेचे उपमहासंचालक डॉ.आर.के. सिंह तसेच इंडियन सोसायटी ऑफ एक्सटेंशन एज्युकेशनचे अध्यक्ष डॉ. यू. एस. गौतम यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. चिचमलातपुरे हे गेल्या दोन वर्षापासून इंडियन सोसायटी ऑफ एक्सटेंशन एज्युकेशनच्या कार्यकारी परिषद सदस्य व विभागीय संपादक म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांना याच संस्थेचा 'यंग सायंटिस्ट अवॉर्ड'देखील मिळाला आहे. विस्तार शिक्षण विषयावर त्याची तीन पुस्तके व ८५ पेक्षा अधिक संशोधन लेख प्रकाशित झाले असून, शैक्षणिक व विस्तार क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाचे दरवाजे उघडणार

**अकोला:** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहे.

आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. शिष्यवृत्तीमध्ये शिक्षण व परीक्षा शुल्क, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक आकस्मिक/इतर खर्च, विमान प्रवास खर्च, विजा शुल्क आणि आरोग्य विमा यांचा समावेश असणार आहे. शैक्षणिक आकस्मिक/इतर खर्च युएएस व इतर देशांसाठी (युके वगळून) १ हजार ५०० युएस डॉलर तर युकेसाठी १ हजार १०० जीबीपी इतका दरवर्षी देण्यात येईल. लाभार्थी विद्यार्थ्याच्या कुटुंबाची उत्पन्न ८ लाख रुपये तसेच विद्यापीठांची क्युस वर्ल्ड रँकिंग मर्यादा २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. विहित निकषानुसार विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास लाभार्थी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल केली जाईल.

# उद्या महाशिवरात्री निमित्त भजन संध्या; आर्ट ऑफ लिव्हिंगचे आयोजन

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**अकोला :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त आर्ट ऑफ लिविंग अकोला परिवारातर्फे भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री श्री रविशंकरजी यांच्या प्रेरणेने आयोजित या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक विक्रम हज़रा यांच्या सान्निध्यात भक्तिमय वातावरणाची अनुभूती घेता येणार आहे. ही भजन संध्या रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ६:०० ते ९:४५ या वेळेत पार पडणार असून, कार्यक्रमाचे ठिकाण डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह, अकोला असे आहे.

आर्ट ऑफ लिविंग परिवाराने नागरिकांना सपरिवार व मित्रांसह उपस्थित राहून भजन, ध्यान आणि अध्यात्मिक आनंदाचा लाभ घेण्याचे सादर आवाहन केले आहे. कार्यक्रमात विविध भक्तिगीत, शिवभजने आणि सामूहिक सहभागातून महाशिवरात्रीचा उत्साह अनुभवायला मिळणार आहे. आर्ट ऑफ लिविंग परिवार च्या वतीने शहरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जुन्या हनुमान मंदिरात शिवपार्वती विवाह सोहळा

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी



**अकोला:** हनुमान बस्तीतील जुन्या हनुमान मंदिरात महाशिवरात्र महोत्सव साजरा केला जातो आहे. विविध कार्यक्रम आयोजित केले जात आहे. महाशिवरात्रीला शिव पार्वती विवाह सोहळा शनिवार आणि रविवारी साजरा केला जाईल.

मेंदी, संगीत, विवाह आणि वरात काढण्यात येईल. विवाह मुहूर्त १५ रोजी सायंकाळी ७ वा. आहे. गौतमेश्वर महिला मंडळकडून मंदिरात धुमधडाक्यात तयारी सुरु आहे. तर, महाप्रसाद वितरण बुधवार, १८ रोजी सायंकाळी ६ वाजता सुरू होईल. हर हर विवाह प्रसंगी उपस्थित राहावे असे आवाहन हनुमान बस्तीतील गौतमेश्वर महिला मंडळ तसेच आयोजकांनी केले आहे.

**श्री. कुणाल झाल्टे, तहसिलदार, कारंजा यांचे कार्यालय, कारंजा**
**रा.मा. क्र.टी.एन.सी.-४३ /दुधोरा/ /२०२५-२६**

**जाहीरनामा**

या जाहीरनाम्याद्वारे सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री. गोविंदराव जगतराव वावगे व इतर ८ रा. दूधोरा ता. कारंजा यांनी मौजे दुधोरा ता. कारंजा येथील सर्व्हे नं./गट नं. ६६/1 अ मधील ३.८९ हे. आर. या शेत जमीनीचे कायदेशीर वारस असून, सदर शेत जमीन मुंबई कुळ कायदा (विदर्भ विभाग) १९५८ च्या कलम ४९ अनुसार अर्जदार यांना ६६/1 या जमिनीच्या मालक घोषित करून मिळणे बाबत अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे.

याबाबत कोणास हरकत/ आक्षेप दाखल करावयाचा असल्यास त्यांनी सदरचा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकती/ आक्षेप सादर करावे विहित मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/ हरकत अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**स्थळ:** कारंजा
**दिनांक:** ०४/१०/२०२५

**(कुणाल झाल्टे)**
**तहसिलदार, कारंजा**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. १४ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com


# पोहरादेवी येथे संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव

## राज्यातील समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहा : ना. संजय राठोड

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**यवतमाळ** : बंजारा काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवी (जि. वाशीम) संत नगरीत श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव १४ फेब्रुवारी रोजी शनिवारी पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य, बनजारा विरासत संघाच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार हे उपस्थित राहणार आहेत. संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील गोर बंजारा समाजबांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री लोकनेते ना. संजय राठोड यांनी केले आहे.

जय सेवालाल बोलो, पोहरागड चालो, असा नारा ना. संजय राठोड यांनी दिला आहे. यावेळी बंजारा काशी तीर्थक्षेत्र पोहरादेवीत श्री संत सेवालाल महाराज जयंती महोत्सव उदघाटन व सेवा रत्न पुरस्कार सोहळा मान्यवरांच्या हस्ते लाखो सेवा भक्तांच्या साक्षीने



पार पडणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजित पवार, मृदू व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई, कृषिमंत्री तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक हे उपस्थित राहणार आहेत. शुभआशीर्वाद देण्यासाठी धर्मगुरु महंत तथा आमदार श्री. बाबुसिंग महाराज, धर्मगुरू महंत श्री. कबीरदास महाराज यांची उपस्थिती राहील. त्याच बरोबर यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख, विधान परिषद सदस्य श्रीमती भावनाताई गवळी, विधान परिषद सदस्य राजेश राठोड, विधानसभा सदस्य तुषार राठोड, विधानसभा सदस्य श्रीमती सईताई प्रकाश डहाके, पदवीधर मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य धीरज लिंगाडे, शिक्षक मतदार संघाचे विधान परिषद सदस्य किरण सरनाईक, माजी खासदार हरिभाऊ राठोड, माजी आमदार निलय नाईक, वाशीम जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, वाशीम जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, वाशीम मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विशेष उपस्थितीमध्ये महंत जितेंद्र महाराज, महंत सुनील महाराज, महंत यशवंत महाराज, महंत शेखर महाराज, महंत गोपाल महाराज आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दुपारी १ वाजता पोहरादेवीच्या संतनगरीत आगमन होणार असुन आदिमाया शक्ती देवी जगदंबा, जगतगुरु संत सेवालाल महाराज आणि महान तपस्वी संत डॉ. रामराव बापू यांच्या समाधीस्थळी दर्शन घेऊन श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव साजरा करण्यासाठी मान्यवरासह हजेरी लावणार आहेत. शनिवारी दि. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १ वाजतापर्यंत संत सेवालाल महाराज प्रांगणात सेवा प्रसाद वाटप, दुपारी ४.३० ते ६ अल्पोपहार, रात्री ९ वाजता सेवा प्रसाद वाटप तसेच भजन कीर्तन कार्यक्रम, यावेळी सकाळच्या सुमारास 'जातेन हातेम लेन चालो सेवालाल तू' या बंजारा गीतासह विविध गीते गायन करून घराघरात पोहचलेल्या गायिका मंगली यांचा गाण्यांचा बहारदार कार्यक्रम पार पडणार आहे.

सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजता "टकटक देखरो सावरिया" बंजारा गीतासह गुलाबी साडी गाणी गाणारा तरुण गायक संजू राठोड यांच्या गाण्याचा बहारदार कार्यक्रमासह लेझर शो, ड्रॉइंग शो आणि फायर शो साजरा होणार आहे. या सोहळ्याला राज्यभरातील गोर बंजारा समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य, बनजारा विरासत संघ व निमंत्रक राज्याचे मृदू व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्हयाचे पालकमंत्री संजय राठोड यांनी केले आहे.

# जिल्ह्यात आग लागून होणाऱ्या ट्रॅव्हल्स अपघाताच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना जारी

## जिल्हाधिकारी विकास मीना यांचे ट्रॅव्हल्स एजन्सी संचालकांना पत्रक

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**यवतमाळ** : जिल्ह्यात आग लागून ट्रॅव्हल्स अपघात होणे यामध्ये जीवितहानी झाल्याच्या घटनांची नोंद यापूर्वी झालेली असून आग लागून अपघात होणे यामध्ये वाढ होत आहे. त्यामुळे पुढील कालावधीत अशा घटनांची नोंद होऊ नये याकरिता जिल्हा प्रशासनाच्या वतीने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे पत्रक जिल्हाधिकारी विकास मीना यांनी ट्रॅव्हल्स एजन्सी संचालकांना पत्रक जारी केले आहे.

या मार्गदर्शक सुचनानुसार, प्रत्येक ट्रॅव्हल्स मालक यांनी दर पंधरा दिवसांनी आपल्या वाहनाची वेळोवेळी तांत्रिक व्यक्ती यांच्याकडून तपासणी करण्यात यावी, वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन जाऊ नये, लांब पल्ल्याच्या प्रवासाला रात्री पाळी द्रुतगती रोडवर गाडी चालवताना दोन चालक ठेवावीत जेणेकरून त्यांच्याकडून आळीपाळीने गाडी चालवता येईल, ट्रॅव्हल्स मालक यांनी आपल्या संस्थेतील सर्व चालक, वाहक, सफाई कामगार यांची महिन्यातून एकदा आरोग्य तपासणी करणे बंधनकारक राहील, सर्व ट्रॅव्हल्स मालक यांनी परिवहन विभाग यांनी आखून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील. ट्रॅव्हल्सचा अपघात झाल्यास प्रवासी यांना तात्काळ बाहेर निघता येईल यासाठी संकटकालीन खिडकी दर्शक फलक लावण्यात यावे. ट्रॅव्हल्समध्ये अग्निशमन विभाग यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आवश्यक ते फायर एक्स्टिंग्यूशर ठेवण्यात यावे तसेच चालक व वाहक यांना यंत्र हाताळणीचे प्रशिक्षण अग्निशमन विभाग यांच्याकडून देण्यात यावे, अशा मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. या निर्देशांचे सर्व ट्रॅव्हल्स मालक यांनी काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विकास मीना यांनी दिले आहे.

# नगरसेविकेने नाकारला बैठक भत्ता; मुख्यमंत्री सहाय्यता निधीत वर्ग करण्याचा ऐतिहासिक निर्णय

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**उमरखेड** : उमरखेड नगर पालिकेत प्रभाग क्रमांक ८ मधून निवडून आलेल्या खुशबू पवन मेंढे यांनी एक सामाजिकदृष्टीने कौतुकास्पद निर्णय घेतला आहे. नगरसेवकांना महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ च्या कलम ६१(१) नुसार देण्यात येणारे बैठक भत्ते मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये वर्ग करून गरजू रुग्णांना देण्याचे त्यांनी ठरवले.

मुख्याधिकारी यांना दिलेल्या लेखी निवेदनात खुशबू पवन मेंढे यांनी नमूद केले की, त्यांच्या बैठकीच्या मानधनाचा उपयोग गरीब आणि गरजू रुग्णांच्या आरोग्यासाठी होईल. अशा प्रकारचा निर्णय घेणारी ती राज्यातील पहिली नगरसेविका बनली आहे.

या निर्णयामुळे नगरसेविकेचा सामाजिक दृष्टिकोन आणि लोकसेवा भाव अधोरेखित झाला असून, अनेक स्तरांवरून त्यांचे कौतुक होत आहे. हा निर्णय राज्यातील इतर लोकप्रतिनिधींसाठी आदर्श ठरू




शकतो, तसेच राजकारण हे समाजसेवेचे माध्यम बनू शकते, हे त्यांच्या कृतीतून सिद्ध झाले आहे.

**खुशबू पवन मेंढे यांचे म्हणणे :**

"राजकारणातून देखील सामाजिक कार्य करता येते. लोकप्रतिनिधी म्हणून सामजिक भान असणे महत्त्वाचे असते.

मला शासनाकडून मिळणारा बैठक भत्ता जर गरजू रुग्णांच्या कामी येत असेल, तर मी स्वतःला भाग्यवान समजते. हे कोणावर उपकार नसून लोकांनी मला निवडून दिल्याची छोटीशी परतफेड आहे."

# 16 फेब्रुवारीला महिला लोकशाही दिन

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**यवतमाळ** : महिलांच्या तक्रार निवारणासाठी जिल्हा महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित केला जातो. या महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार दि.16 फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे आयोजित करण्यात आला आहे.

तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरीय महिला लोकशाही दिन आयोजित केला जातो. महिलांनी प्रथम या लोकशाही दिनात तक्रार दाखल करावी. सदर तक्रारीवर योग्य कारवाई झाली नसल्यास जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनात तालुकास्तरीय लोकशाही दिनात केलेले अर्ज व टोकन क्रमांकासह तक्रार सादर करावे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी आणि वैयक्तिक तक्रार किंवा निवेदने स्विकारले जाणार नाहीत, याची महिलांनी नोंद घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी केले आहे.

# हरवलेली ४० हजारांची पिशवी केली परत

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**आर्णी** : वर्दळीमुळे गजबजलेल्या तहसील कार्यालय परिसरात आज प्रामाणिकपणाचे एक उदाहरण घडले. वरुड भक्त येथील रहिवासी व माजी सरपंच सुरेश पांडुरंग काळे यांची तब्बल ४० हजार रुपये रोख रक्कम असलेली पिशवी तहसील परिसरात हरवली होती.

ही पिशवी हरिओमसिंह बघेल यांच्या निदर्शनास येताच त्यांनी क्षणभरही विलंब न करता आपली सामाजिक जबाबदारी ओळखून ती तात्काळ तहसील प्रशासनाकडे सुपूर्द केली.

पिशवीचे मालक कोण आहेत हे तपासून तहसिलदारांनी ती सुरेश पांडुरंग काळे यांच्याकडे परत केली.

या प्रसंगी तालुका दंडाधिकारी वैशाख वाहूरवाघ, नायब तहसीलदार उदय तूंडलवार, नायब तहसीलदार एस. एस. अदमुलवार, पत्रकार प्रमोद कुदळे, राजेश माहेश्वरी, रशिद मलनस, मनोज माघाडे उपस्थित होते.

सुरेश काळे यांनी मोठी रक्कम प्रामाणिकपणे परत मिळाल्याबद्दल पत्रकरार हरिओमसिंह बघेल व तहसील प्रशासनाचे आभार मानले.



# जगतगुरु संत रविदास महाराज जयंती उत्सव

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**आर्णी** : गुरु रविदास बहुउद्देशिय संस्था, आर्णी यांच्या वतीने तसेच गुरु रविदास युवा मंच, आर्णी आणि गुरु रविदास महिला आघाडी, आर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने जगतगुरु संत रविदास महाराज जयंती उत्सव २०२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

१५ फेब्रुवारीला रेणुका मंगल कार्यालय, माहुरे लेआऊट, आर्णी येथे या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात संत रविदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, अभिवादन, कीर्तन, भजन तसेच मान्यवरांचे मार्गदर्शनपर विचार होणार असून विविध



सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची रेलचेल राहणार आहे. जयंतीनिमित्त परिसरातील सर्व नागरिक, समाजबांधव व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुसद उपजिल्हा रुग्णालयात जागतिक युनानी दिन व कर्करोग दिन

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**पुसद** : उपजिल्हा रुग्णालय, पुसद येथे महान हकीम, विद्वान आणि स्वातंत्र्यसैनिक हकीम अजमल खान यांच्या जयंतीनिमित्त जागतिक युनानी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुग्णालयाच्या अधीक्षक डॉ. एम. एम. भेलोंडे उपस्थित होत्या.

आयुष मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने दरवर्षी ११ फेब्रुवारी रोजी जागतिक युनानी दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदा




दिनाची संकल्पना "युनानी प्रॅक्टिसमध्ये नवीनता व पुरावा (Innovation and Evidence in Unani Practice)" अशी होती. यानिमित्त आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ. सय्यद इमरान यांनी मार्गदर्शन करताना आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांमध्ये वाढ होत असल्याचे सांगितले. त्यांनी भारतीय चिकित्सा पद्धतीचा अवलंब करून जीवनशैलीत सकारात्मक बदल केल्यास या आजारांपासून दूर राहणे शक्य असल्याचे स्पष्ट केले. केंद्रीय युनानी चिकित्सा अनुसंधान परिषद (CCRUM) विविध आजारांवर संशोधन करून प्रभावी उपचार पद्धती विकसित करत असून, असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रणासाठी प्रयत्न करत आहे. जगातील मधुमेही रुग्णांपैकी मोठा वाटा भारतात असल्याची बाब चिंताजनक असून, युनानी उपचार पद्धती भविष्यात प्रभावी ठरू शकते, असे डॉ. सय्यद इमरान यांनी व्यक्त केले. याच पार्श्वभूमीवर जागतिक कर्करोग दिनानिमित्त मार्गदर्शन शिबिराचे आयोजनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भेलोंडे तर प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. सुहासिनी भोपी (पुसद गायनिक ऑब्स्टेट्रिक्स सोसायटी अध्यक्षा) उपस्थित होत्या. डॉ. भोपी यांनी महिलांच्या आरोग्याविषयी, विशेषतः स्त्रीरोग व कर्करोग प्रतिबंधाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. भेलोंडे यांनी कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि शासकीय योजनांचा लाभ कसा घ्यावा याबाबत नागरिकांना माहिती दिली. उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमास उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहिणी लोणकर, डॉ. आशिष कदम, डॉ. पूर्वी धरमशी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अन्नात किडा; ग्राहकाने तक्रार दाखल केली

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**उमरखेड** : शहरातील एका हॉटेलमध्ये जेवणादरम्यान किडा आढळल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत पोलीस वसाहत, उमरखेड येथील रहिवासी निलेश रंगरावजी राउत (वय ४१) यांनी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, ११ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ८.३० ते ९.३० दरम्यान त्यांनी कुटुंबासह जेवण घेतले. जेवणादरम्यान दाल तडका मध्ये दगड आढळल्याचा अनुभव आला. पनीर मसाला स्पायसी मागविल्यावर भाजीमध्ये कच्च्या मिरच्या टाकल्याचेही त्यांनी नोंदवले. त्यांच्या ७ वर्षीय मुलाने भातात किडा आढळल्याचे सांगितले. तपासणी केल्यावर तो शिजलेला किडा असल्याचे आढळले.

सदर घटनेनंतर ग्राहकाने संबंधित हॉटेल व्यवस्थापनाला तक्रार नोंदवली. परिणामी कुटुंबाने अर्धवट जेवण सोडले.

तसेच, हॉटेलचे स्वयंपाकघर अस्वच्छ असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सदर घटनेनंतर नागरिकांकडून अन्न व औषध प्रशासनाकडे तातडीने सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात येत आहे.

परिसरातील सर्व हॉटेल, ढाबे व रेस्टॉरंटच्या स्वयंपाकगृहांची विशेष तपासणी करून अस्वच्छ अन्न पुरविणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याचीही मागणी होत आहे. या घटनेतून नागरिकांनी जेवणासाठी सतर्क राहण्याची गरज अधोरेखित केली आहे. प्रशासनाने कार्यवाही करून नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करण्याचे महत्त्व पुन्हा एकदा लक्षात आणून दिले आहे.

# १९ उपविभागात दीर्घ पदयात्रा; स्मार्ट मीटर व वीज योजनेची जनजागृती

प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**यवतमाळ** : यवतमाळ शहरासह जिल्ह्यातील महावितरणच्या १९ उपविभागांमध्ये आज दीर्घ पदयात्रा काढून वीज ग्राहकांमध्ये जनजागृती केली गेली. या पदयात्रेचा मुख्य उद्देश स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत माहिती देणे, वीज चोरी प्रतिबंध, वेळेत वीजबिल भरण्याचे महत्त्व आणि महावितरणच्या विविध ग्राहकाभिमुख योजनांचा प्रसार करणे हा होता.

यवतमाळ शहरातील पदयात्रा अधीक्षक अभियंता प्रविण दरोली यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. विभागनिहाय



कार्यकारी अभियंते संजय खंगार, पुरूषोत्तम चव्हाण, नरेंद्र कटारे, ब्रजेश गुप्ता, जनार्धन चव्हाण यांचे प्रमुख उपस्थितीत मार्गदर्शन करण्यात आले. पदयात्रेदरम्यान वीज सुरक्षेबाबत माहिती देत, स्मार्ट मीटर फायदे, प्रधानमंत्री सौर कृषी पंप योजना, मोफत सुर्यघर योजना, वीज बिल भरा व थकबाकी टाळा यासंबंधी बॅनर आणि फलकांच्या माध्यमातून जनजागृती केली गेली.

महावितरणमध्ये ९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान स्मार्ट मीटर पंधरवाडा राबविण्यात येत असून, याचा भाग म्हणून आज अमरावती परिमंडळात हा दीर्घ लॉंग मार्च आयोजित करण्यात आला. पदयात्रेत हजारो कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवून ग्राहकांपर्यंत योजना पोहचविण्यास हातभार लावला. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये वीज सेवांबाबत जागरूकता वाढणे, सुरक्षिततेची शपथ घेणे व महावितरणच्या योजनांचा लाभ घेणे यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण होईल, अशी अपेक्षा वीज प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# आ. राजूभाऊ तोडसाम यांच्या वाढदिवसानिमित्त महाआरोग्य शिबिर; ७५२ रुग्णांची तपासणी





प्रतिनिधी १४ फेब्रुवारी

**आर्णी** : आमदार, आर्णी विधानसभा मतदारसंघ संघाचे आमदार राजूभाऊ तोडसाम यांच्या वाढदिवसानिमित्त आर्णी तालुक्यात महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

माहेर मंगल कार्यालय, आर्णी येथे पार पडलेल्या या शिबिरात एकूण ७५२ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यापैकी २२६ रुग्णांना पुढील विशेष उपचारासाठी आचार्य विनोबा भावे रुग्णालय, सावंगी मेघे येथे पाठविण्यात येणार आहे.

तसेच सुमारे २६ रुग्णांची ईसीजी तपासणी करण्यात आली. हे शिबिर राजूभाऊ मित्रपरिवार, आर्णी व आचार्य विनोबा भावे रुग्णालय, सावंगी मेघे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार राजूभाऊ तोडसाम उपस्थित होते.

तसेच एन. पी. शिंगणे (रुग्ण जनसंपर्क अधिकारी, मेघे ग्रुप/अदानी ग्रुप), प्रियाताई तोडसाम, नीताताई, राजेश आडे, प्रकाश राठोड, राजेश आडे, किसन राठोड, अनंता गावंडे, विलास राऊत, डॉ. श्याम गुठे, डॉ. रमेश व्यवहारे, डॉ. सत्तुरवार, विशाल देशमुख, मंगेश वानखडे, निखिल ब्राह्मणकर, गोपाल शर्मा, सचिन आडे, विनोद भाऊ राठोड, प्रा. गोपने, प्रा. मेश्राम, अमोल चिल्लरवार, बादल भाऊ, महेश काळबांडे, अमोल ठाकरे, किसन लडके, उमेश राठोड, राम आगीरकर, विश्वजीत मस्के, शिवाजी भालेवाड, बबलू तिवारी, कल्पजीत देवकर, मंगेश सोयम, राणा कुरसंगे, मोहन आगीरकर, सुनील पूसनाके, संजय राठोड व वैभव कुडमत यांची उपस्थिती होती.

५

# सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

लाखो रुपयांचा घोटाळा, फसवेगिरीतून पैसा केला गोळा...

# चौकशी लागणार पुन्हा, दाखल होणार गुन्हा !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजनेतील गैरप्रकरणाला दिवसागणिक नवी कलाटणी मिळत आहे. प्राथमिक चौकशी त्यावर जिल्हा कृषी अधिकाऱ्यांचा अभिप्राय आणि त्या अनुषंगाने विभागीय कृषी सहसंचालक यांनी केलेली कार्यवाही या सर्व बाबींचे ' गूढ ' एसआयटी चौकशीशिवाय उलगडणार नाही ! असे जिल्हावासी बोलत आहेत. प्राप्त तक्रारीच्या मुख्य मुद्द्यालाच बगल देऊन सदर गंभीर प्रकरण दडपण्याचा केविलवाणा प्रयत्न आता स्पष्ट झाला आहे. परिणामी या गैरप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणी जोर धरत आहे. त्यामुळे या लाखों रुपयांच्या घोटाळ्याची पुन्हा फेरचौकशी करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

## अकार्यक्षम अधिकारी, भ्रष्टाचारात कर्तबगारी

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील पोकरा गैरप्रकरणाने जिल्हा कृषी विभागाची लक्तरे राज्याच्या वेशीवर टांगल्या गेली आहेत. यात अकार्यक्षम कृषी अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचारात कर्तबगारी करणाऱ्या कृषिसहाय्यकांना वाचविण्यासाठी केलेला केविलवाणा प्रयत्न प्रशासनाच्या कार्यप्रणालीवरच प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. सदर गैरप्रकरणाची पुराव्यासहित ३३ पानांची तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. मात्र सबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी ऑनलाईन तक्रारीचा धागा पकडून सदर प्रकरणात चौकशीची केवळ घाई दाखवण्यात आली आहे. घाईघाईत केलेली प्राथमिक चौकशी, लगेचच जिल्हा कृषी अधिकाऱ्यांचा अभिप्राय आणि विभागीय कृषी सहसंचालक यांचे कार्यवाही करण्याचे पत्र हा



सर्व प्रकार राज्याच्या पारदर्शक व्यवस्थेला अशोभनीय ठरत आहे. कारण शेलुखडसे येथील पोकरा योजनेत झालेल्या गैरप्रकाराची पुराव्यासहित तक्रार दाखल करण्यात आली आहे. त्यात गट नंबर ६३३ मधील कथित बोगस फळबागेचा प्रकार दृष्टिहीन माणसाच्या सहज लक्षात येईल इतका पारदर्शक आहे. त्यासाठी कुठलेही तंत्र वापरण्याची आवश्यकता नाही. मात्र त्याच गटात पतीच्या नावावर असलेली वडिलोपार्जित जुनी विहीर असताना पोकरा योजनेतून पत्नीच्या नावावर विहिरीचा लाभ देणे केवळ नियमबाह्यच नव्हे; तर तो एक गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. पोकरा योजनेतून गट नंबर ६३३ मध्ये जी विहीर देण्यात आली आहे. त्या विहिरी पासून केवळ शंभर ते दीडशे फुटावर जुनी विहीर आजही अस्तित्वात आहे. ती आजमितीस खचलेली व वापरात नसेलही परंतु सदर विहीर महसूल दप्तरी नोंद असल्याचे पुरावे तक्रारीसोबत तर जोडलेले आहेतच, परंतु तपास अधिकारी अनिल राठोड यांनी मागितलेल्या लेखी जबाबासोबत तक्रारदार यांनी पुन्हा स्पष्ट व साक्षांकित प्रतित सादर केले आहेत. मात्र याच गंभीर मुद्द्याला बगल देण्यात आल्याने पोकरा घोटाळ्यातील ' गूढ ' अधिकच वाढत चालले आहे. हा प्रकार चव्हाट्यावर आल्यानंतर उपविभागीय कृषी कार्यालयाकडून जी काही सावरासावर केली जात आहे ती वाखाणण्यालायक ठरत आहे. त्यामुळे यात केवळ क्षेत्रीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना वाचविण्यासाठी प्रयत्न होत आहे, की स्वतः सुखरूप राहण्यासाठी खटाटोप केला जात आहे असा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या पारदर्शक व विश्वासार्हतेला तडा जात आहे. याची खबरदारी सबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे असे मत सर्व सामान्य जनता व्यक्त करीत आहे. कारण सदर तक्रार कृषी संचालक पुणे व महाराष्ट्राचे लोकायुक्त यांच्याकडे करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे या प्रकरणी एसआयटी नेमून पुन्हा फेरचौकशी होणार हे निश्चित आहे. आणि शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर गुन्ह्यांची नोंद होणार ही कळ्या दगडावरची पांढरी रेष आहे.

## पात्र लाभार्थ्यांना डावलले, अपात्रांचे घर भरले...

शेलुखडसे येथील पोकरा योजनेतून विहीर मिळावी म्हणून येथील पात्र लाभार्थी रवि अर्जुन खडसे या प्रयोगशील शेतकऱ्याने सर्वातआधी विहिरीचा प्रस्ताव दाखल केला होता. त्या अनुषंगाने सदर शेतकऱ्याला पूर्वसंमती सुद्धा मिळाली होती. मात्र कृषी सहायकाच्या मनातील हरामी इथे सुद्धा आड आली. दुसऱ्याच दिवशी प्राधान्य क्रमाने आलेल्या पहिल्या प्रस्तावाची विहीर जाणीवपूर्वक रद्द करण्यात आली. आणि दुसऱ्या अपात्र लाभार्थ्याची नियमबाह्य विहीर मंजूर करण्यात आली. हा प्रकार जेंव्हा येथील पोकरा घोटाळा चव्हाट्यावर आला तेंव्हा कुठ मोठा गैरप्रकार झाला असल्याचे सर्वांच्याच लक्षात आले. मात्र एका होतकरू व प्रयोगशील शेतकऱ्याची मंजूर झालेली विहीर नामंजूर करून सदर शेतकऱ्याच्या प्रयोगशील स्वप्नांचा चुराडा एका कृषी सहाय्यकाने केला. त्यामुळे या




क्लेशदायक प्रकरणाचा सर्वच स्तरातून निषेध होत आहे. या गंभीर प्रकाराची सुद्धा सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार रवि अर्जुन खडसे यांनी दि. १३ फेब्रुवारी रोजी राज्याचे कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे व विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांच्याकडे केली आहे. अशा अनेक तक्रारी आता समोर येत असून पोकरा भाग - २ ही योजना पारदर्शक राबविल्या जावी यासाठी भ्रष्ट अधिकारी व कर्मचारी आणि शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी अपेक्षा सर्व सामान्य नागरिक व्यक्त करीत आहेत.

**४३ वृत्तातून सिटी न्युजचा पाठपुरावा सुरूच**




# थोडक्यात

## येवती येथील सरपंच अपात्र!

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

येवती येथील सरपंच सौ. योगिता गजानन माळेकर यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम३९(१) अंतर्गत थेट अपात्र ठरविण्यात आले आहे. अप्पर आयुक्त अमरावती यांनी दि.६ फेब्रुवारी२०२६ रोजी दिलेल्या या आदेशामुळे त्यांचे सरपंच पद तसेच सदस्य तत्त्वही तात्काळ रद्द झाले आहे. या निर्णयामुळे रिसोड तालुक्यातील मोठी खळबळ उडाली असून, येवती गावातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.


## बालयोगी ब्रह्मचारी तपस्वी गजानद महाराजांची सदिच्छा भेट !



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळनाथ येथे परम पूजनीय श्री समर्थ सदगुरु गजानद माऊली श्री क्षेत्र महाकाली संस्था श्री श्री महर्षी मातंग ऋषी आश्रम धर्मपीठ कासोळा देव पुसद जिल्हा यवतमाळ येथील बाल योगी ब्रह्मचारी तपस्वी सद्गुरु यांनी आपले शिष्य गणेश रामचंद्र ढोबळे नवीन सोनखास बायपास रोड मंगरूळनाथ यांच्या निवासस्थानी तसेच स्त्रीशक्ती अंगणवाडी महिला कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित मंगरूळपीर या संस्थेस सदिच्छा भेट देऊन त्यांना पुढील कार्य करण्यास उपकृत केले व गणेश ढोबळे व त्यांची सह पत्नी सोनल ढोबळे या सर्व कुटुंबाने त्यांचे स्वागत करून आशीर्वाद घेतले.

## तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पानटपरीधारकांवर कारवाई



●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय, वाशिम यांच्या वतीने तंबाखू नियंत्रण कायदा (कोटपा) २००३ अन्वये पानटपरीधारकांवर कारवाई करण्यात आली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी तसेच वाशिम पोलीस स्टेशन (शहरी)चे पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी ही कारवाई राबविण्यात आली. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर व वाशिम पोलीस स्टेशन (शहरी) यांच्या संयुक्त विद्यमाने कोटपा कायदा २००३ मधील कलम ६(अ) व ६(ब) चे उल्लंघन करणाऱ्या एकूण १८ पानटपरीधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ३ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, राणी लक्ष्मीबाई कन्या शाळा परिसर, पाटणी चौक व रिसोड नाका या ठिकाणी ही तपासणी व कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे जिल्हा सल्लागार डॉ. आदित्य पांडारकर, मानसशास्त्रज्ञ राम सरकटे, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे, मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे जिल्हा समन्वयक मंगेश गायकवाड, पोलीस स्टेशन (शहरी) विभागाचे पोलीस कर्मचारी तसेच गृह रक्षक दलाचे समादेशक यांचा सहभाग होता.

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

# दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये ठेकेदाराची दादागिरी दररोज वाढत आहे. या ठेकेदारासोबत रेल्वे अधिकाऱ्यांची भागिदारी असल्यामुळे आपले कोणची काही करू शकत नसल्याने तो मग्रूर ठेकेदार प्रवाशाना अश्लिल भाषेत महिलांसमोरच शिवीगाळ करून मारहाणीची भाषा करतो, या सर्व प्रकाराला वाशीम शहरातील नागरिक त्रस्त झाले असून त्याच्यावर कारवाईची मागणी होत आहे.






माणुसकी नावाचा काही प्रकार असतो. चांगल्या बोलण्याने वागल्याने माणुस पैशाकडेही पाहत नाही रेल्वे स्टेशनच्या परिसरात गाडी आल्यापासुन मोठ्या आवाजात दादागिरीने बोलुन लोखंडी रॉड घेऊन मारण्याच्याच हेतुने ठेकेदार उभा असतो प्रेमाने काहीच बोलत नाही. घाण घाण शिवीगाळ करत गाडी पार्कींग करा. नाहीतर मारहाण करण्याच्या थेट धमक्या देतो. प्रवाशा सोबत बहुतांशी महिला व मुलीअसतात त्यांनाही न जुमानता मागील पुढील विचार न करता थेट अश्लिल शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देतो. अनेकांना रॉडने मारहानी केल्याच्या सुध्दा तक्रारी आहेत. प्रेमाने प्रवाशी भिकाऱ्याला व तृतीय पंथ्याला १० रुपयाऐवजी २० रुपये देतात. मात्र हा मगरुर ठेकेदार ६ रुपयाच्या पार्कींगसाठी प्रवाशांवर दादागिरी करतो. त्याला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याची साथ असल्याची चर्चा आहे. वाशीम रेल्वे स्टेशन येथील पार्किंगमध्ये अनेक धक्कादायक प्रकार उघडकीस येत आहेत. पार्कींग मधील बाईक घेण्यासाठी आलेल्या




युवकासह थेट पोलिसांना पार्किंग ठेकेदाराने अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून या पार्कींग ठेकेदारावर पोलिसांकडून कठोर कारवाई व्हावी अशी मागणी सर्व सत्तरातुन होत आहे.

## आर्थिक संकटात सापडलेल्या संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करा

***सभापती विष्णुपंत भुतेकर * मुख्यमंत्र्यांकडे भूमिपुत्र शेतकरी संघटनेची मागणी**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

अलीकडच्या दोन तीन वर्षापासून नैसर्गिक वातावरणामुळे संत्रा उत्पादन कमालीचे घटले आहे. ऐन संत्रा बागांना पाण्याचा ताण देण्याच्या कालावधीत अवकाळी पाऊस पडत असल्याने फळधारणा होण्यास बाधा निर्माण होत आहे. परिणामी उत्पन्नात घट होऊन संत्रा उत्पादक शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहेत. विद्रिग्नअवस्थेत असलेल्या अनेक शेतकऱ्यांनी आपल्या संत्रा बागेवर बुलडोझर फिरवला असल्याचे सर्वश्रुत आहे. संत्रा उत्पादन आणि उत्पादक शेतकरी वाचवायचे असेल तर या शेतकऱ्यांना किमान हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्याची मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा रिसोड बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



पश्चिम विदर्भात हजारो एकरात संत्रा फळ पीक घेतले जाते. संत्रा बागांना पाण्याचा ताण देण्याच्या काळात गेल्या २०२५ मधे मे महिन्यात सततधार पाऊस चालू राहला. मे महिन्यात सुरु झालेला पाऊस ऑक्टोबर, नोव्हेंबर पर्यंत थांबलाच नाही, त्यामुळे बागाना फळ धारणा झाली नाही. अनेक बागेत हजारो झाडांना एकही फळ धरले नाही. त्यामुळे संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत असतांना सरकारने सर्व संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हेक्ट्री एक लाख रुपये मदत देण्याची मागणी भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून राज्याचे मुखमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या कडे करण्यात आली आहे.

## आचार्य श्री १०८ समयसागरजी महाराज यांचा चातुर्मास !

### शिरपूर (जैन) येथे होण्यासाठी दिगंबर जैन समितीचे आचार्यश्रींना निवेदन

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

विश्ववंदनीय युग श्रेष्ठ, उत्तम समाधीस्त, संत शिरोमणी आचार्य भगवंत १०८ विद्यासाग?जी महामुनीराज यांचे परम प्रभावक शिष्य विद्यमान पट्टाचार्य १०८ समयसागरजी महामुनिराज मुनी संघासह सिद्धक्षेत्र मुक्तागिरी येथे विराजमान आहेत. मुक्तागिरी येथे जाऊन श्री दिगंबर जैन महासमितीचे विदर्भ अध्यक्ष अभिनंदन पेंढारी, महासमितीचे उपाध्यक्ष प्रा. प्रशांत गडेकर, वाशीम जिल्ह्याचे अध्यक्ष प्रमोद मानेकर, प्रांजल जैन, अरुण आहाळे, वेरूळ चे संजय महाजन, शशिकांत महाजन यांचेसह सर्व पदाधिकाऱ्यांनी व गुरुभक्त परिवारांनी, आचार्य श्री समयसागरजी



महाराजांचे दर्शन घेऊन श्रीफळ गुरुचरणी अर्पण केले. आचार्य भगवंतांचा आशीर्वाद घेऊन गुरुदेवांनी सहसंघ, वर्ष २०२६ मधील

आचार्य भगवंत यांची अमरावती विभाग आगमनी प्रित्यर्थ नवीन उत्साह व वातावरणात स्वागताची जय्यत तयारी केल्या जाईल याबाबत विदर्भ अध्यक्ष पेंढारी, विदर्भ उपाध्यक्ष प्राचार्य गडेकर यांनी मत व्यक्त केले. तर कारंजा येथून राजाभाऊ डोणगावकर यांनी देखील कारंजात जय्यत तयारी समस्त जैन समाजाकडून केली जाईल म्हणून समाज बांधवांना सोबत सभा आयोजित करून आनंद व्यक्त केला. समस्त गुरुभक्त परिवाराने श्रीफळ अर्पण केले. शिरपूर जैन ची प्रस्तावना बालब्रह्मचारी तात्या भैया यांनी केली. सोबत ट्रस्टचे अध्यक्ष सचिव व संघर्ष समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बालब्रह्मचारी पंकज भैया यांनी शिरपूरची विशेषता व कमतरता बाबत आचार्य भगवंत यांच्या आगमनाने कमतरतेत सुधारणा होऊन विशेषता बाबत संबोधन केले.

याप्रसंगी विद्यासागर जी महाराज की जय समय सागर जी महाराज की जय चा जयघोष करण्यात आला. या प्रसंगी आचार्य श्री समयसागरजी महाराजांनी या बाबत उपस्थितांकडून पूर्ण माहिती घेतली . मुक्तागिरी येथुन ,वेरूळ अमरावती ,वाशीम, शिरपूर (जैन)किती किलोमीटर आहे , याबाबत चर्चा केली व तसेच दिगंबर जैन महासमिती च्या कार्याची माहिती विदर्भ अध्यक्ष अभिनंदन पेंढारी ,उपाध्यक्ष प्रा.प्रशांत गडेकर यांनी दिली सर्व महासमितीच्या सदस्यांना, समस्त गुरु भक्तांना आचार्य भगवंतांचे पाद प्रक्षालन केले. आचार्यश्रींनी आशीर्वाद देत धर्मकार्याचे कार्य समिती कडून सतत घडत राहो अशी अपेक्षा व्यक्त केली .

वसुलीसाठी मात्र, दिखावा म्हणून अन्न व औषध प्रशासनाचे धाडसत्र...

# हप्त्याचे वाढविण्यासाठी रेट, कारवाई करतात थेट !

## कधीकधीच दिखावा म्हणून टाकतात धाडी, दरमहा वसुलीसाठी पाठवितात गडी

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

अनसिंग येथे अन्न व प्रशासन विभागाने धाड टाकून विना प्रिस्क्रिप्शन औषधी विकल्या जात असल्याचा प्रकार उघडकिस आला. त्यावरून स्त्रिभ्रूण हत्येला खतपाणी घालणाऱ्या औषधी व कामत्तेजक गोळ्याचा साठा जप्त केला, मात्र अन्न प्रशासन विभागाला कधीकधीच दिखावा म्हणून जाग येतो आणि धाडसत्र टाकायला सुरूवात करतात. त्यामधून हप्त्याचे रेट वाढविण्याचे नियोजन करण्यासाठी थेट कारवाई करतात. धाडी टाकून वसुलीसाठी दरमहा आपला गडी पाठवितात. त्यामुळे या प्रशासनाचा दुपटीपणा उघड झाला आहे. कधीकधीच कारवाई करून चांगूलपणाचा आव आणणाऱ्या अन्न व औषध प्रशासन




विभागाला भ्रष्टाचाराने पोकरले आहे.

अन्न व प्रशासन विभागाचे कार्यालय वाशीममध्ये सुरू होवूनही ठोस कारवाई नाहीत. अनेक वर्षापासून ठाम मांडणारे भ्रष्ट अधिकारी फक्त वसुलीसाठीच पुढाकार घेतात. प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे मे. आई मेडिकल स्टोअर, अनसिंग येथे डमी ग्राहक पाठविण्यात आला. गर्भपातासंदर्भातील औषधांची मागणी केल्यानंतर कोणतेही वैध वैद्यकीय प्रिस्क्रिप्शन न पाहता औषधांची विक्री केल्याचे आढळून आले. औषध निरीक्षकांनी तपासणी केली असता गर्भपात औषध किटचा साठा मिळून आला. या साठ्याच्या खरेदी-विक्री संदर्भातील कोणतीही वैध नोंद, पावती अथवा साठा नोंदवही उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले.

सदर औषधे पंचनामा करून जप्त करण्यात आली असून नमुने शासकीय औषध विश्लेषण प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत. यानंतर संशयाच्या आधारे सहाय्यक आयुक्त (औषधे) गजानन घिरके यांच्या नेतृत्वाखाली पथकाने खडसिंगी-अनसिंग परिसरात तपासणी केली. ही कारवाई अभिनंदनीय असली तरी या विभागाचे कार्य मात्र, निदनियच आहे. त्यामुळे या विभागाने कारवाईचा धडका लावून सर्व मेडीकलवरच कारवाई करावी व आपला विभाग जिवंत असल्याचे दाखवावे.

## एनएची अट रद्द, जाचक प्रक्रियेतून जनतेला मोठा दिलासा - पुरुषोत्तम चितलांगे

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील युती सरकार व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या धडाकेबाज निर्णय प्रक्रियेमुळे जमीन धारकांसाठी एन ए परवानगीची अट जाचक प्रक्रिये तून जनतेला मोठा दिलासा मिळालेला आहे. ही जमीन धारकां साठी आनंदाची बातमी असल्याचे मत भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चिपलांगे यांनी व्यक्त केले. मंगळवारी राज्य शासनाने याविषयीचा शासन आदेश जारी केला. यापूर्वी राज्यात बांधकामानसाठी जमीन अकृषक परवानगी असणे आवश्यक होते. जिल्हाधिकाऱ्यां कडून अकृषक कर भरून जमीन बिनशेती करून घेणे आवश्यक होते. एन.ए परवानगी असल्याशिवाय बांधकाम परवानगी मिळत नव्हती. राज्यातील अकृषक वापर असलेल्या जमिनीवर महसूल विभागा कडून दरवर्षी अकृषक कर आकारला जात होता. तर स्थानिक संस्था नगरपालिका ग्रामपंचायती



त्यावर मालमत्ता कर ही आकार होत्या. या दुहेरी कर पद्धतीला राज्यात अनेक वर्षां पासून विरोध होता. तो लक्षात घेत राज्य सरकारने एन.ए.ची अट रद्द केली आहे. नागरिकांना यापुढे बांधकामांसाठी संबंधित नगररचना विभागाला अथवा स्थानिक प्राधिकरणाकडे अर्ज सादर करावा लागणार आहे. या कार्यालया कडून एक वेळ अकृषक शुल्क भरून घेतल्या जाईल आणि ले-आऊटला मंजुरी दिली जाणार आहे. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यां कडून अकृषक परवानगी साठी स्वतंत्र परवानगीची गरज नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि.१४ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# मनातील प्रेम भावना व्यक्त करण्याचा 'व्हॅलेंटाईन डे'

आज १४ फेब्रुवारी 'व्हॅलेंटाईन डे'. हा दिवस म्हणजे मनातील प्रेम भावना व्यक्त करण्याचा खास दिवस. हा दिवस फक्त जोडप्यांसाठी वा प्रेमिकांसाठीच नाही तर आईवडील, मित्रमैत्रिणी, कुटुंबिय यांच्याविषयी असलेले प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी असते. त्यासाठी फार मोठ्या भेटवस्तू, चॉकलेट्स देण्या घेण्याची गरज असतेच असे नाही. स्वतः च्या हस्ताक्षरातील सुंदर कार्ड, एखादं फुल किंवा गोड शब्दात आपल्या परिजनांशी साधलेला संवाद एव्हढ्यानेही मने जुळतात. शेवटी मनाने एकमेकांना जोडून ठेवणार 'प्रेम' हीच सगळ्यात अमूल्य रेशमी भेट आहे. राग, मतभेद विसरून जपू या नात्यांची ऊब ......प्रेम, विश्वास आणि साथ हेच या दिवसाचे खरे स्वरूप आहे या विषयी दुमत नसावे.

डोळयातल्या
स्वप्नाला कधी
प्रत्यक्षांतही आण,
हे न सांगताही जाण,
**अर्जुन खिरोडकार**
हिवरखेड अकोला



विश्वास का धागा इतना गहरा हो, की हर मुश्किल मे साथ खडा हो. नाता यह सात फेरो का है, इसमे विश्वास का रंग गहरा हो- **ॲड.सौ. ममता अमर तिवारी,अकोला**





आपली पहिली भेट..नवी ओळख..
एक सुगंध मनात ठेऊन गेली,
तसं पाहिलं तर अनोळखीच होतो आपण,
तरी एक बंध मनात ठेवून गेली.
**अभिजीत शेगांवकर ,अकोला.**



प्रथम विजेते

**माझा सखा, माझा जोडीदार..**
"संसाराच्या साध्या चौकटीत आनंदाचे रंग, भरणारा माझा आधार आहात तुम्ही, माझ्या स्वप्नांना विश्वासाचे आकाश देणारा खंबीर विस्तार आहात तुम्ही,
कधी मित्र तर कधी मार्गदर्शक होऊन तुम्ही आयुष्य समृध्द केले,तुमच्या सोबतीनेच माझ्या आयुष्याला खऱ्या अर्थाने घरपण आले."
**सौ.तेजस्वीनी प्रविण वानखडे**, बुलढाणा









सुखाच्या या वाटेवर तू आणि मी,
जणू काही सांजवेळेची गोड स्वप्ने.
तुझ्या प्रेमाने भरलंय माझं आयुष्य,
तू माझ्या ह्रदयाचं सर्वात खरं घर आहेस.
**सौ.गायत्री शुभम टोले,अकोला**



जीवन की बगियां हरी रहें, जीवन में खुशियां भरी रहें,
यह जोडी यूं ही बनी रहें,सौं सालों तक यूं ही सजी रहे
**विक्रम तिवारी, अकोला.**






उल्फत में शब्दों की अहमियत नहीं होती,
दिल के जज्बातों की आवाज नहीं होती,
आँखें बयान कर देती हैं दिल की दास्ताँ,
मोहब्बत लफ्जों की मोहताज नहीं होती.
**सौ. मेघा अनिकेत काळे, अकोला.**




तुझ्यासोबत जगणं म्हणजे स्वप्न खरं होणं असतं,
तू माझा आधार आणि आयुष्याची ताकद आहेस,
तुझ्यामुळेच माझ घर, घरासारखं वाटतं,
सर्वात सुंदर भेटी मुळे मला आयुष्यात जगावं वाटत.
**सौ.मनिषाताई राहुल खारोडे, अकोला.**






तुझ्या गीतात शब्द हरवले माझे, अन तुझ्या शब्दांत हरवले मी,
तुझ्या नजरेत दिसले भाव माझे, अन तुझ्या भावात समरसले मी - **सौं. मंजु सुनील तुलशान. अकोला**



प्रोत्साहन विजेते

पैशाने खुप काही घेता येते
पण जीवनात आई सारखे स्वर्ग, आणि बापा सारखी सावली कधीच मिळत नाही. **पंडित राजेश शर्मा अकोला**



तृतीय विजेते


व्हॅलेंटाईन डे आपल्याला प्रेम, काळजी आणि कृतज्ञतेचे महत्त्व आठवून देतो. आजच्या धावपळीच्या जगात, लोक अनेकदा त्यांच्या भावना व्यक्त करायला विसरतात. हा दिवस सर्वांना मोकळेपणाने संवाद साधण्यास आणि नातेसंबंध मजबूत करण्यास प्रोत्साहित करतो. तथापि, प्रेम फक्त एका दिवसापुरते मर्यादित नसावे. खरे प्रेम आणि दयाळूपणा दररोज हावभाव, समजूतदारपणा आणि आदर याद्वारे व्यक्त झाला पाहिजे
**सौ.संध्या बी. बोरकर,अकोला**



लोग बचते हैं समंदर से लेकिन, हम तुम्हारी आँखों में डूबने को तैयार हैं, किसे दिखाए क्या चाहत करे, तुमको जो देख लिया है एक बार, लोग कहते हैं चाँद का टुकडा हो तुम, और हम कहते हैं चाँद टुकडा है तुम्हारा, **आदित्य तुलशान अकोला.**



**प्रिय कांचन..**
बत्तीस साल बाद भी तुझसे वहीं पहला सा प्यार है,
तेरी मुस्कान में ही है घुला मेरा सारा संसार है,
सुबह की चाय में घुले तेरे अपनेपन से,
हर दिन मुझे लगता जैसे फिर से हुआ इकरार है.
**सुनील नावंदर**, अकोला.



**मेरी जीवन साथी..**
प्रेमाला वयाची अट नसते,
दोन जीवांना एकमेकांची ओढ असते,
ते नात खुप गोड असते, ज्याला जगाची पर्वा नसते
**एड. दिनेश.दी.तुलशान** अकोला



चिडचिड करणारी मी.. समजून घेणारा तो..,
बडबड करणारी मी ...,बडबड ऐकणारा तो,
उतावीळ जोपसणारी मी.., चुटकीत प्रॉब्लेम सोडवणारा तो,
बस असंच आहे त्याच माझं नात, त्याच्या मनात सदा राहिल मी.. **सौ.विद्या देशमुख , अकोला.**



माझ्या अस्तित्वाची ओळख आणि संसाराचा आधार म्हणजे तुम्ही. कडक शिस्तीचा बाप, तर कधी चुका पोटात घेणारी आई झालात. शब्दांशिवाय माझं मन वाचणारं तुम्ही माझं हक्काचं आभाळ आहात. तुमच्या प्रेमाची ओढ ही केवळ भावना नाही ,तर माझ्या जगण्याचं बळ आहे.
**पं. हेमंत शर्मा ,अकोला.**



द्वितीय विजेते

तुम मेरे जीवन में एक पालतू जानवर बनकर आए, लेकिन मेरे दिल के सबसे अहम हिस्से बन गए। तुम सिर्फ मेरे कुत्ते नहीं, बल्कि मेरे परिवार हो।
तुम्हारे कारण मेरे दिन रोशन और मेरा दिल हल्का महसूस होता है। मैं तुमसे बहुत जुड़ा हुआ हूँ और तुम्हारे बिना अपनी दुनिया की कल्पना भी नहीं कर सकता। मैं तुमसे इतना प्यार करता हूँ कि शब्दों में बयां नहीं कर सकता। **अमन ठाकुर अकोला.**



**आई बाबा....** मैने फरिश्ते को तो नहीं देखा,
ना ही भगवान को देखा है, लेकिन हा अपनी जिंदगी हमारे लिए, जो जिया हैं ऐसे दो इन्सान को देखा है.
**सौ. श्रध्दा शेगांवकर** , अकोला.



इश्क उम्र नहीं देखता क्योंकि सुकून हर उम्र में जरूरी होता है.
**सौ. राजश्री शर्मा अकोला.**

दै. सिटी न्यूज सुपरफास्ट कडून विजेत्यांचे अभिनंदन तसेच विजेत्यांना पुरस्कारा बाबतीत माहिती फोनवर दिली जाईल.

**संकलनः दिपक शर्मा, अकोला**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724 - 2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK